

राजित-अपराजित

# माणूस



० मे १९७०

चाळीस पैसे

३० मे १९७०

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष नववे : अंक बावन्नावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर । सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३०    दूरध्वनी : ५७३५९

किंमत : ४० पैसे    वार्षिक वर्गणी : वीस रुपये    परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

' माणूस 'चा चाहता व वाचक या नात्याने काही सूचना करीत आहे.

१. शक्य झाल्यास तामीळ साप्ताहिकांचे आपण अवलोकन करावे. लाखावर खप असलेली व भारताबाहेर आवर्जून वाचली जाणारी २।३ साप्ताहिके आहेत. आकर्षक सजावट व विविधता ही त्यांची वैशिष्टये आहेत.

२. आपल्या साप्ताहिकात हल्ली विषयांचे अनोखेपण दिसून येत नाही. वातावरणाच्या ओघात महत्त्व पावलेले विषय आपण निवडता. यापूर्वी दाक्षिणायन, अन्नस्वतंत्रता, परकीय मदत, ब्रेन–ड्रेन इत्यादी लेख गाजले, ते त्यातील Contents मुळे हे जितके खरे, तितकेच विषयांच्या नाविन्यापुढे ते नजरेत भरले. आपल्या ' मार्ग ' सदराची वाटचाल या संदर्भात उल्लेखनीय आहे.

३. माझ्या मते खालील विषयांवर लेख प्रसिद्ध होणे आजची गरज आहे.

(अ) उत्तर-भारतातील विद्यापीठातून विद्येचे धिंडवडे.

(ब) संपत्ति–मूलभूत हक्क ?

(क) विज्ञान व तांत्रिक ज्ञानाशी संबंधित छंद व छोटे उद्योगधंदे.

(ड) हिंसात्मक मार्ग–धोरण म्हणून राबवणाऱ्या संघटना.

(इ) गणित व संख्याशास्त्र यांचे वाढते महत्त्व.

(ई) समाजात पसरलेल्या गँगज्, रॅकेटस् वा हितसंबंधी साखळ्या व त्यायोगे होणारे शोषण.

मे २१, १९७०    अश्विनीकुमार फडके, पुणे

प्रकाशित लेख, चित्र इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्र काल्पनिक.

# न लिहून कसे चालेल ?

लिहावे की न लिहावे हाच प्रश्न आहे ! लिहावे म्हटले तर वाटेल त्या गोष्टी लेखणीतून बाहेर पडून पूर्वग्रह दूषित असल्याचा आरोप येईल. न लिहावे म्हटले तर कर्तव्यच्युतीचा दोष येईल. लिहायचे म्हटले तर कोणत्या लाजिरवाण्या गोष्टी लिहाव्यात ? माणुसकीला, सभ्यतेला शरम आणणाऱ्या प्रत्यक्ष घटनांचे वर्णन करून १९४७ च्या फाळणीची आठवण करून द्यावी की आजचे भेकड राजकीय पक्ष स्वतःच्या स्वार्थासाठी अशा घटनांचा कसा नीच वापर करतात हे सांगावे ? की जातीय प्रश्न म्हटला म्हणजे मी मी म्हणवणारे बुद्धिवादी रॅशनालिस्ट कसे घसरतात आणि भडकतात हे लिहावे ? राज्यकर्त्यांच्या नालायकपणाचे तरी किती म्हणून वर्णन करायचे आणि आपल्या लोकांच्या रानटीपणाबद्दलही किती लिहायचे ?

आणि न लिहून कसे चालेल ? भिवंडी पेटली असताना सरकार म्हणे स्वस्थ होते (आणि मंत्री झोपले होते). आपण तरी दखल घेतली पाहिजे. पिढ्यान्‌पिढ्या शेजारी शेजारी राहणारे लोक एकमेकांच्या अंगावर दगड, लाठ्या, भाले आणि अॅसिड बल्ब्स फेकू लागले, एकमेकांच्या आयाबहिणींना पेटत्या घरांमध्ये दगड मारमारून लोटू लागले तर त्याची दखल घ्यायला नको ? ज्याने त्या आगी पाहिल्या आहेत, त्या किंकाळ्या ऐकल्या आहेत, लोकांच्या डोळ्यातील रानटी खून पाहिला आणि सडलेल्या प्रेताची दुर्गंधी अनुभवली आहे त्याला तरी स्वस्थ बसवणार नाही. दखल घेतलीच पाहिजे.

पण दखल घेऊन न घेऊन होणार काय ? दखल घेऊनही शिवजयंतीची मिरवणूक निघायची राहिली नसती. आधी मिरवणुकीने लुटालूट केली की मिरवणुकीवरच आधी हल्ला झाला हा वाद निघायचा राहिला नसता. पुढची जाळपोळ, लुटालूटही थांबली नसती. गृहखात्याचे राज्यमंत्री त्यासाठी जागे राहिले असते तरी या गोष्टी घडायच्या थांबल्या नसत्या. हे घडणार हे सरकारला माहीत होते. राज्याच्या आणि केंद्र सरकारच्या गुप्तहेर खात्यांनी सरकारला धोक्याचा इषारा दिला होता. तरी हे घडायचे राहिले नाही. मग उपयोग काय ? दखल घेण्यात मतलब काय ?

भिवंडी पेटली, घरे पेटली, मुडदे पडले. नंतर जळगाव पेटले. मग महाड डोंबिवली, कल्याण, ठाणे भागातले वातावरण तंग झाले. हे लिहीत असताना मुंबईतही वातावरण तंगच होते. काय झाले ? कित्येक मुडदे पडले, कित्येक जखमी झाले, शेकडो कुटुंबे बरबाद झाली. तरीही आधी मिरवणूक की आधी दगडफेक हा प्रश्न शिल्लक राहतो ? शेवटी गुन्हेगार कोण ? तुम्ही, आम्ही, सरकार, झोपाळू मंत्री,

जनता की भिवंडीचे लोक ? की आमची परंपरागत भांडणे ? हे आता जस्टीस मदन कमिशन ठरवेल. पण आमच्या जुन्या परंपरा, ऐतिहासिक संघर्ष, नेहरू, गांधी, जीना यांना अपराधी ठरविणे जस्टीस मदन कमिशनच्या अधिकारकक्षेत बसते ?

आमच्याच पक्षाने आधी इशारा दिला होता पण सरकारने ऐकले नाही असे एकूण एक पक्ष आता मानभावीपणे सांगताहेत. हे पक्ष गेली २० वर्षे काय करीत होते ? त्या त्या जमातीच्या मतासाठी त्यांच्या पुढाऱ्याची दाढी धरणे, त्या जमातीच्या मोहल्ल्यांमधून त्याच जमातीचे लोक निवडणुकीसाठी उभे करायचे या व्यतिरिक्त या पक्षांनी काय केले ? भिवंडीचे सोडा. इतरत्र, भिवंडीच्या अगोदर त्यांनी काय केले ? भिवंडीनंतर तरी हिंदू मुस्लीम ऐक्यासाठी या पक्षांचा काही ठोस कार्यक्रम आहे का ?

मुस्लीम मनुष्य जेवढा बुद्धिवादी तेवढाच तो जातीयवादी असतो असा अनुभव आहे. समतोल विचार करणारे मुस्लीम पुढारी विरळा. घटना घडली की कुठलाही विचार न करता हे मुस्लीमाचीच बाजू घेणार असे का घडते ? अगदी मार्क्सिस्ट कम्युनिस्ट मुस्लीमही जातीय दंगलीच्या वेळी हिंदूच्या विरुद्ध बोंब उठवतात. हिंदू पुढाऱ्याचे तसे नाही. अनेक हिंदू पुढारी असे दाखवून देता येतील की जे कोणत्याही बाबतीत फक्त मुस्लीमाचीच बाजू घेतात. कोणताही विचार न करता. हेही टोकाचे उदाहरण झाले. पण असे हिंदू पुढारी आहेत. मुस्लिमांमध्ये अशी हिंदूची बाजू घेणारे पुढारी का नाहीत ? निदान समतोल विचार करणारे पुढारी तरी का नाहीत ? हिंदूचेही सगळे पुढारी समंजस असतात असे नाही.

"झोपड्यांमध्ये राहणारा मुस्लिम समाज दरिद्री असतो. दंगल झाली तर गमाविण्यासारखे त्याच्याकडे काही नसते म्हणून त्यांचे पुढारी त्यांना वापरू शकतात," एक बुद्धिवादी मुस्लीम मला म्हणाला. "मलबार हिलवरच्या एखाद्या नबाबाने आपल्या शेजारच्या शेटजीच्या बंगल्यात जाऊन त्याला चाकूने भोसकले किंवा त्याचा रेडिओग्रॅम जाळला असे कधी घडत नाही. कारण त्या दोघांनाही आपल्या वस्तूना जपायचे असते"

"याला उपाय एकच. शिक्षण ! पुरेसे शिक्षण मिळून आर्थिक परिस्थिती सुधारली की आमच्यातले भडक माथ्याचे लोक कमी होतील. पण हे शिक्षण कसे मिळेल हाच प्रश्न आहे. कारण सध्याचे शिक्षण अगदी एकतर्फी असते. ट्रॅजेडी ही आहे की आम्हा मुस्लीमांमध्ये दोनच वर्ग आहेत. उच्चभ्रू श्रीमंत वर्ग आणि एकदम झोपडपट्ट्यांत राहणारा कनिष्ठ वर्ग, मध्यमवर्ग संख्येने अगदी कमी. त्यामुळे समाज-शिक्षणाचे काम खऱ्या अर्थाने हिरीरीने हाती घेणारा कोणताही वर्ग आमच्या जमातीत नाही."

हा बुद्धिवादी मुस्लीम विद्यार्थी एका मोठ्या घराण्यातला. त्याला आपल्या समाजात घडणाऱ्या गोष्टीची चीड आहे. समाजासाठी, देशासाठी त्याला खूप काहीतरी

[पृष्ठ ५७ वर]

सु. ल. सोमण

# लोकसभेत जातीय दंगली !

लोकसभेत परवा, महाराष्ट्रातल्या जातीय दंगलीवर चर्चा झाली. ही चर्चा अद्याप अपुरी आहे. ससदेतल्या ह्या चर्चेला खऱ्याखुऱ्या 'चर्चे'चं स्वरूप होतं का हा चर्चेचाच विषय ठरावा. वस्तुतः जनसघाध्यक्ष श्री. वाजपेयी व पंतप्रधान ह्यांच्या-तला तो वादंग होता. श्री. अटलबिहारीजींनी वस्तुस्थिती निवेदली. तीही गृहमंत्रा-लयाने प्रसिद्ध केलेल्या अहवालाचा आधार घेऊन. गेल्या दीड वर्षातल्या २३ जातीय दंगलीपैकी जवळजवळ सर्वच, म्हणजे २२ दंगली अल्पसंख्य मुस्लिमानी सुरू केल्या. त्याची स्वाभाविक प्रतिक्रिया हिंदूवर झाली, आणि साहजिकच, परि-णामतः अल्पसख्य मुस्लिमांना जबर नुकसान सोसावे लागले. गृहमंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या अहवालाचा हा साराश जनसंघाध्यक्षांनी लोकसभेत सागितला. आणि त्याबरोबरच पंतप्रधानांचा भडका उडाला. गृहमंत्रालयाच्या अहवालात मुस्लिमानी बहुसख्य दगलीना सुरुवात केली तरी त्याची वाच्यता करणे, 'सेक्युलर भारतात' दडनीय आहे, हे अटलबिहारीजीना माहीत नाही का? दंगलीना सुरुवात कुणी का करीना, मुसलमानाचं अपरिमीत नुकसान झाले आहे, आणि ह्याची सपूर्ण जबाबदारी आक्रमकवादी (का कायस) 'हिंदू'वर आहे. त्याना चिथावणाऱ्या सघटनावर आहे. अल्पसंख्याकाचं, त्याच्या हितसबंधांच प्राणपणानं रक्षण करणं आवश्यक आहे. ही अगदी वास्तव बाजू इंदिराजीनी माडली. हिरीरीने मांडली. अल्पसख्य म्हणजे एखादं लहानसं पोर. मारला असेल त्यानं एखादा सुरुवातीचा दगड. केला असेल एखादा खून. पण म्हणून काय, बहूसख्य दादानं, त्याचा सूड घ्यायला निघायचं? तर वाजपेयीजी, आपण वस्तुस्थिती मांडली असली तरी, तीमुळे अल्पसख्यांकांवर अन्याय केला आहे. आपण सेक्युलरवादाचे गुन्हेगार आहात. आपल्याला 'बंदी' हीच एक योग्य शिक्षा आहे! पाकिस्तानशी चुवाचुबी करणाऱ्या माओला नेता मानणारे ते नक्षलवादी, रशियन युद्धसाहित्य पाकिस्तानात अवतरल्यापासून 'लीग'शी सख्य बाळगणारे डांगे-मिरजकर – ते सगळेही असच म्हणताहेत. चूक आहे ती हिंदू जातीयवाद्याची! त्यांच्याविरुद्ध कारवाई झालीच पाहिजे.

तर मडळी, लोकसभेत गाजलेल्या 'चर्चे'चा किस्सा हा असा आहे. राग-अनुराग झाले खरे पण दंगलीमुळे सर्वांनाच फावलं हेही तितकच खरं. मी ह्या-आधी म्हटल्याप्रमाणे ह्या दगलीमागे अस्सल कम्युनिस्टी तंत्रही असू शकेल. पण तूर्त तरी दंगलीचा फायदा घेऊन, कम्युनिझमला कडवा विरोध करणाऱ्यांवर

चिखलफेक करायला कम्युनिस्टांना साधन मिळालं आहे. कम्युनिस्टांच्या धोक्याला विसरलेल्या पतप्रधान कंपनीला जनसंघावर तोंडसुख घ्यायला वाव मिळाला आहे. तर जनसंघीय व आदि पक्षीयाना सरकारवर टीका करायला साधन मिळालं आहे. थोडक्यात दंगलीवर सार्थ चर्चा करण्याऐवजी प्रत्येक पक्षानं (सरकारी पक्षासह) स्वतःचे राजकीय घोडेच तेवढे पुढे दामटण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात लोकसभेतील चर्चेमुळे जातीय दंगलीच्या मुळाशी पोचून, मुळावर घाव घालणारा काही विधायक तोडगा निघेल ही आशाच, अशा चर्चेमुळे खुटली आहे.

दंगली बऱ्याचशा निवळल्यानंतर आता पक्षोपक्षांचे विवेध जण भिवंडी-जळगावला भेटी देताहेत. प्रश्नाची न्यायालयीन चौकशी होत आहे हे विसरून, स्वतःच्या प्रतिक्रिया, स्वतःची मतं मांडत आहेत. धर्मनिरपेक्षता, समाजवाद, वगैरे शब्दांचे जडजंबाल माजवणाऱ्या पक्षांच्या नेत्यांना आता विशेष कंठ फुटले आहेत. ह्या मंडळींचे अनेक प्रतिनिधी, कार्यकर्ते भिवंडी-जळगावला आहेत. हे सारे ऐन दंगलीच्या वेळी कुठे लुप्त झाले होते? त्यानी त्यावेळी पुढे होऊन उभय पक्षांना थोपवलं का नाही? अर्थात हे प्रश्न विचारायचे नसतात. केवळ शब्दांच्या मोहजालावर चालणाऱ्या 'लोकशाहीत' तर नाहीतच नाही. दंगलीनंतर सर्वच राजकीय पुढाऱ्याना ऊत येतो. त्याच वक्तव्य वहरू लागतं न् त्यातून बव्हंशी, त्याना पसत नसलेल्या किंवा त्यांच्या आड येणाऱ्या राजकीय मतप्रणालींवर टीकास्त्र सोडले जाते. ह्या साऱ्याचा मतितार्थ एवढाच की, ह्या दंगली धार्मिक—जातीयतेच्या नावाखाली भडकत असल्या तरी त्या खऱ्या राजकीय होत. अल्पबहुसंख्याकांच्या भावना पद्धतशीर चेतवून त्या पेटवल्या जातात. त्यामुळे, अनिष्ट असली तरी, पक्षोपक्षाची एकमेकांवरील टीका समजू शकते. पण प्रत्येक दंगलीनंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर होणारी टीका मात्र समजू शकत नाही. जनसंघाला नेतृत्व पुरविणारी 'संघटना' एवढ्याच कारणामुळे संघावर टीका होत असली तर गोष्ट वेगळी.

वस्तुतः राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आज तरी अर्धमेल्या अवस्थेत आहे. संघाच्या आजच्या अवस्थेला सघच कारणीभूत आहे. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर, ह्या संघटनेला फारसा थारा नाही. ह्या संघटनेची सारी व्याप्ति आहे मूठभर ब्राह्मणात त्याबाहेर कुणी संघाला विचारत नाही, आणि संघही तिथवर पोहोचू इच्छित नाही. संघाजवळ निश्चित कार्यक्रम आहे असही वाटत नाही. ना राजकीय ना सामाजिक. निरर्थक 'बौद्धिकं' आणि सांज-शाखा ह्यांच्या घोटाळ्यात सापडलेल्या संघात निष्क्रियताच पसरली आहे. राजकीय महत्त्वाकांक्षा त्याना नाहीत. सध्याच्या पीडीत हिंदू समाजाबद्दलही त्याच्याजवळ कार्यक्रम नाहीत. नाहीतर, मुंबईच्या हजारो झोपडपट्ट्या, कामगारवस्त्या ह्यातून गलितगात्र जीवन जगणाऱ्या समाजा-

[पृष्ठ ५५ वर]

रातराणी

विजय तेंडुलकर

# टु सर विथ लव्ह

त्या माणसाकडे निळे डोळे नाहीत. भुरभुरते सोनेरी पिंगट केस नाहीत. धारदार नाक नाही. एकादी मुरड पडताच स्त्रीजातीचे भान हरपावे असे ओठ आणि जिवणी नाही. त्याला रूपच नाही. आणि तरीही जगातल्या सर्वात मोठ्या चित्र नगरीत त्याच्यासाठी आज चित्रपट घेतले जातात. त्याच्या सोयीने कथानके शोधून त्या कथानकांवर त्याच्या भूमिकेला प्राधान्य देणाऱ्या पटकथा तयार केल्या जातात. त्याच्या सवडीने या पटकथांवर चित्रपट घडतात आणि केवळ त्याचे नाव आहे म्हणून हजारो प्रेक्षक विश्वासाने या चित्रपटांकडे धाव घेतात.

टु सर विथ लव्ह हा असा चित्रपट आहे. सिडने पॉइशिए या विलक्षण ताकदीच्या नीग्रो नटासाठी हा चित्रपट घेतला आहे. या चित्रपटाच्या इंचाइंचात या नीग्रो नटाचे तगडे, सभ्य, स्फोटक, हळुवार व्यक्तिमत्त्व भरले आहे. पॉइशिए-भोवतीच एकाद्या गोफासारखा हा चित्रपट फिरत रहातो आणि त्याच्याशीच संपतो.

पूर्वी तुरुंगातून पळालेला गुन्हेगार, अमेरिकन गुप्त पोलिस खात्यातील अधिकारी, गोऱ्या तरुणीचा सुसंस्कृत नीग्रो प्रियकर असल्या भूमिका केलेला पॉइशिए या चित्रपटात शिक्षक झाला आहे. लंडनच्या दरिद्री पूर्व भागातल्या एका शाळेत तो शिक्षक होतो. शिक्षकाचा त्याचा पेशा नाही. तो पत्करण्याची त्याची इच्छाही नाही. पेशाने तो इंजिनियर आहे. त्याच्या क्षेत्रात त्याला एकादी बरी नोकरी मिळेपर्यंत तात्पुरती चरितार्थासाठी तो मास्तरकी पत्करतो आणि अशा अडल्या माणसांना तात्पुरत्या नोकऱ्या देणाऱ्या शाळा जशा असाव्यात तशीच ही शाळा आहे. दरिद्री वर्गातली किंवा इतर शाळांतून काढून टाकलेली मुलेच इथे शिकतात. शिकण्यासाठी मुळी बहुतेक मुले या शाळेत येतच नाहीत. ती येतात वेळ घालवण्या-साठी. त्यात ही शाळा मुलांमुलींची एकत्र आहे. वरच्या वर्गातून लग्नाच्या वयाच्या मुली आणि मिशी फुटलेले मुलगे दिसतात. त्यांचे खुशाल शिक्षकांसमोर एकमेकांशी प्रेम-चाळे चालतात. इतकेच नव्हे तर सर्व मिळून एखाद्या शिक्षकाला आपल्या



पुन्हा एकदा
आव्हान स्वीकारणारे
मुलांचे 'काळे' सर !

अनंत खोड्यांनी आणि उपद्व्यापांनी इतके सळो की पळो करून सोडतात की शाळा सोडून पळण्यापलीकडे त्या शिक्षकाला दुसरा पर्यायच उरत नाही.

असा एक शिक्षक पळतो.

त्याच्या जागी येतो तो सिडने पॉइशिए.

या नटाची एक गंमत आहे. त्याच्या अनेकविध परस्परविरुद्ध भूमिकात तो आपल्या व्यक्तिमत्त्वात दृश्य स्वरूपाचा कोणताही बदल करीत नाही. असा बदल होऊही शकणार नाही इतके त्याचे व्यक्तिमत्त्वही ठसठशीत आहे. या चित्रपटात गुप्तपोलिस किंवा तुरुंग फोडून पळालेला गुन्हेगार सिडने पॉइशिए मास्तर बनतो तो केवळ त्याच्या समजदार अभिनयकौशल्याने. मास्तर म्हणून उगाच कोणत्याही लकबी न घेता, साधा एकादा चष्माही डोळ्यांवर न ठेवता अगदी सहजी तो मास्तर होऊन आपल्यापुढे वावरतो, बोलतो आणि आपल्याला पटतो.

तो वर्गावर पहिल्या दिवशी जातो. समोर विद्यार्थी असणार ही त्याने केलेली कल्पना संपूर्ण चुकते. समोर बाकावर बुटाच्या तंगड्या रचलेले, च्युइंग गम चघळणारे, एकमेकांना शिव्या घालणारे, वेडेवाकडे पोषाख केलेले आणि 'आयला हे कोण आलं आणखिन' म्हणून कावून बघणारे काही तरुण स्त्री-पुरुष त्याला

दिसतात. यांना शिकवायचे या कल्पनेनेच कुणाही शिक्षकाच्या तोंडचे पाणी पळावे; पॉइशिए सरांच्या तोंडचे पाणी सहजासहजी पळणे शक्य नसते. डोके बिनसू न देता ते, शिकण्याची तिळमात्र इच्छा नसलेल्या या चेहऱ्यापुढे क्रमिक पुस्तकातल्या विषयाची गीता कर्तव्यबुद्धीने वाचतात. परिणामी समोरच्या बाकावर चालतो तो गोंधळ दिवसगतीने कमी होण्याऐवजी वाढतच निघतो. हरप्रकारे या नव्या 'काळे सरा'चा पाणउतारा त्याचे गुंडपुंड आणि बंड विद्यार्थी करतात. सराच्या शिकवण्यात पुस्तके एकमेकावर फेकण्यापासून आणि जांभया देण्यापासून बाहेर जाताना वर्गाचे दार धडाड्दिशी लावण्यापर्यंत आणि ते पुन्हा उघडून सॉरी, सर म्हणण्यापर्यंत अनेक चमत्कारिक व्यत्यय आणणे, ते बूट खाड्खाड् वाजवीत शाळेच्या इमारतीत रुबाबात शिरत असता पाण्याने भरलेली प्लास्टिकची पिशवी वरून त्याच्या डोक्यावर बदाक्कन् हापटणे, वर्गात काहीतरी पेटवून देणे असल्या अकल्पित आणि एकाहून एक भयकर चाळचानी या नव्या सरानाही वाटेस लावण्याची वर्गाची जिद्द; पण काळे सर वेळोवेळी संताप गिळून संयमपूर्वक आपले अध्यापनाचे प्राप्त कर्तव्य करीत रहातात.

हा सयम एक दिवशी सपतो. पोरानी (!) टेबलाचा एक पाय कापून तो होता तसा अल्लद लावून ठेवला आहे. सर येतात. अभ्यासाला सुरुवात करतात. टेबलावर सवयीप्रमाणे रेलतात आणि टेबलासकट प्लॅटफॉर्मवरून पोरामध्ये कोसळून भुईसपाट होतात. पोरे पोटे धरधरून हसताहेत. सर उठतात. टेबलाचा पद्धतशीर कापलेला पाय त्याना दिसताच त्याचा एवढ्या दिवसाचा ताणलेला सयम तुटण्याच्या घाईला येतो. तो लाकडी भक्कम पाय तसा हाती धरून समोरच्या हसणाऱ्या छद्मी चेहऱ्याकडे पहाताना त्याच्या मनातला क्रोध उकळून उठतो आणि वाटते की या खुंटाने सर्वांना बडवून काढावे—खुंट मोडेपर्यंत !

सर वर्गातून निघून जातात. स्टाफ-रूममध्ये वारवार दहा आकडे मोजतात पण क्रोध आवरत नाही. हेही कळते की क्रोध उपयोगाचा नाही, विवेकाचीच गरज आहे. क्रोधाने प्रश्न सुटणार नाही, आणखीच चिघळेल. आत्मपरीक्षणाची गरज आहे. का असे घडते आहे ? त्याच्या लक्षात येते, ही मुले पाढरपेशा नाहीत. ही सुस्थित कुटुबातली आणि चाकोरीतून पुढे एखादा हुद्दा पकडून जगणारी मुले नाहीत. ही वेगळी आहेत. यांची आयुष्ये, वळणे वेगळी आहेत. सराना एकदम उमगते की यानतर आजपर्यंतच्या पद्धतीने जाऊन चालणार नाही, ही पद्धत चुकली. या मोठाड मुलाना क्रमिक पुस्तकाच्या शिक्षणात कदापि रस लागणे शक्य नाही. त्यांना गरज असलीच तर वेगळ्या प्रकारच्या शिक्षणाची आहे. हे शिक्षण क्रमिक पुस्तकात नाही. दुसऱ्या दिवशी सर वर्गावर जाऊन जवळची पुस्तके सर्वांसमोर कचऱ्याच्या टोपलीत शातपणे टाकून घोषित करतात की आजपासून पुस्तके शिकवणे बंद ! तुम्ही आता लहान नाहीत. उद्या तुम्हीच उघड्या जगात जाऊन आपल्या बळावर जग-

णार आहा. अनेक प्रश्न तुमचे तुम्हाला तुमच्यापुरते सोडवावे लागणार आहेत. जगा-यचे कसे हा मुख्य प्रश्न. हा सोपा नाही. यात अनेक समस्यांना तुम्हाला तोंड द्यावे लागेल. रोजगार, संसार, मुले, अशा अनेक जबाबदाऱ्या घ्याव्या लागतील. म्हणून तुम्हाला हे जग काय आहे ते समजले पाहिजे. लैंगिक व्यवहार समजावून घेतला पाहिजे, त्याचे परिणाम आणि धोके कळले पाहिजेत...

'पोरे' चकित होतात. मास्तरांचे हे नवे रूप त्यांना धक्का देते.

मास्तर सांगतात, तुम्हाला हे शिकले पाहिजे आणि फार लौकर हे सर्व शिकले पाहिजे. एरवी जगण्याच्या स्पर्धेत हराल. नामुष्की पदरी येईल, छीः थू होईल. आज वागता तसे विचार बंद ठेवून गुंडासारखे वागलात तर कदाचित तुरुंग पहावा लागेल. म्हणून लौकर शहाणे व्हा. मी तुम्हाला पुस्तकाऐवजी हे जगण्याचे शिक्षण देणार आहे. तुम्ही हे असे चित्रविचित्र कपडे घालता, वेड्यावाकड्या फॅशन्स करता रीतीविरुद्धच नवनव्या गोष्टी शोधून त्या करता, याचा अर्थ काय? जे आज आहे त्याविरुद्ध हे तुमचे बंड आहे. आहे ठाऊक? प्रस्थापिताविरुद्ध तुमचे बंड आहे...

एकाहून एक मोठाड पोरे बिगारीच्या वर्गात असावीत तशी 'आ' वासतात.

काळे सर म्हणतात, पण हे तुम्हाला आहे का माहीत की जे आज तुम्ही करता ते सारे पूर्वी कुणी तरी केलेलेच आहे? तुमच्या आजच्या केशरचना, तुमचे कपडे दोन चारशे वर्षांपूर्वीची माणसे त्या काळात करीत...

काळे सर वर्गाला एक दिवशी म्युझियममध्ये नेतात. तिथे प्रत्यक्षच साम्य दाखवितात. ऐतिहासिक मानवांचे पुतळे, चित्रे आणि ते पाहणारी वर्गातली आजची पोरे—दोहोंत मजेशीर सारखेपणा. काळाची दरी बुडवून टाकणारी पुनरावृत्ती...नवे नवे नाही, जुने जुने नाही...सारे मिळून एक आवर्त आहे...त्याच गोष्टी पुन्हा पुन्हा...तीच आवर्तने फिरून फिरून...

शिक्षणाच्या या नव्या पद्धतीने पोरे खूष होतात, पण शहाणी होतच नाहीत. शिस्त शिकत नाहीत. ते त्यांच्या रक्तातच नाही. सर्व प्रकारच्या शिस्तीचे त्याना वृत्तीनेच वावडे आहे. मात्र काळे सरांना या वर्गावर शिकवणे आता पूर्वीएवढे अवघड आणि क्लेषदायक रहात नाहीत.

एक बदलही घडतो. मुले आपला विक्षिप्त पोषाख आणि सवयी टाकून जरा 'माणसा'त येतात. त्यांच्या 'बंडा'ची धार किंचित् कमी होते—पण ती फक्त काळेसरांपुरतीच. पी. टी. च्या शिक्षकांशी त्याचा एकदा जोराचा खटका उडतो. वर्गातल्या एका लठ्ठ मुलाला हा शिक्षक इतर मुलाबरोबरीने न झेपणारी एक कसरत करायला लावतो आणि तो मुलगा पोटात वर्मी मार लागून कळवळतो. लोळतो. यासरशी इतर मले खवळतात. त्यातला एक तेथल्या तेथे त्या शिक्षकाचे डोकेच फोडणार असतो—पण काळेसर तेवढ्यात धावत पोचतात. त्या मुलाला

यापासून परावृत्त करतात. हिंसेने प्रश्न सुटत नाहीत हे समजावतात. मुले 'सरां'चे ऐकतात. पण त्यांना यातले काही पटते असे नव्हे.

पण 'सरां'ची बदली पी. टी. चे शिक्षक म्हणून केली जाते. वर्गातली आडदांड पोरे ही संधी घेऊन 'सरां'ना मुष्टियुद्धाचे आव्हान देतात. 'सरां'चे रक्त नीग्रो आफ्रिकन. किती सुसंस्कृत झाले तरी आव्हान खाली पडू देणे या रक्तात नाही. मुष्टियुद्ध होते. 'सर' अपेक्षेनुसार आरंभी बराच मार खातात. पोरांना वाटते या सरामध्ये काहीच दम नाही. पण मग प्रतिस्पर्धी झालेल्या आणि हिंस्रपणे 'सरां'-वर तुटून पडणाऱ्या मुलाच्या पोटात 'सर' एकच गुद्दा नेमका ठेवतात. त्याने तो पार वाकडा तिकडा होऊन कोसळतो. पोरे चकित होतात. काहीशी वचकतात. 'सर'च त्या जाया मुलाला 'दुरुस्त' करतात आणि बजावतात, अंगबळ मेहनीच फायद्याचे ठरेल असे नाही [illegible] उजवाही भेटतो. म्हणून विवेकाने घेतले पाहिजे.

पण 'सरा'चंशा त्यांच्या इंजिनियरिंगच्या क्षेत्रातल्या एकाद्या चांगल्याशा नोकरीसाठी चाललेल्या खटपटीला एव्हाना यश येते आणि हा तात्पुरता पेशा सोडण्याची वेळ येते. 'सर' वर्गाच्या एका नृत्यसमारंभात तसे जाहीर करतात. मुले त्याना मोठा 'सेंडॉफ' देण्याचा घाट घालतात आणि 'काळे सरा'ना वर्गातर्फे एक भेट दिली जाते. 'सर' गहिवरतात. बंद शोभिवंत खोक्यातली ही भेट उघडण्यासाठी अश्रू लपवीत ते एका बाजूला — रिकाम्या वर्गात — जातात. ही भेट म्हणजे शालेय सामन्यात जिंकतात त्याना देण्यात येतात तसला चांदीचा मोठा चषक आहे. तो चषक 'सरा'ना एकदम पुष्कळ काही सांगून जातो. तो चषक सुचवतो की मुलांनी तुला आपले मानलेच नाही, तू 'सामन्या'त जिंकला आहेस एवढेच ती मान्य करीत आहेत. मुलांविरुद्धच्या सामन्यात ? घडला तो सामना होता ? 'सामना जिंकण्यासाठी आपण केले ते सर्व केले ? मग मुलांवर आपण काही संस्कार करतो आहोत असे मानले त्याचे काय झाले ? ते सारे शेवटी व्यर्थच ? सगळा शेवटी सामनाच ? 'सर' विलक्षण अस्वस्थ होऊन जातात. तेवढ्यात एक मुलगा, एक मुलगी वर्गात डोकावतात. आजपासून 'सर' त्यांचे सर नाहीत. दोघे 'सरा'पाशी येऊन एकमेकात म्हणतात, च्यायला सुटलो. पुढल्या वर्षी ही पिडा नाही, चला. आणि निघून जातात. 'सरां'ना हे मनस्वी झोंबते. पुन्हा एकदा आव्हान ! आपण जे मनाशी ठरवले त्यात असे हरून थकून जायचे ? सुसंस्कारांचा आपला सामना नामुष्कीने अर्धाच टाकून पळायचे ? पराभव पत्करायचा ? पराभव ?

'सर' शांतपणे उठतात. खिशातून नव्या इंजिनिअरच्या नोकरीचे नियुक्ती-पत्र काढतात. त्याचे फाडून चिटोरे-चिटोरे करतात. शांतपणे. एका निर्धाराने.

ते सामना अर्धा टाकणार नाहीत. ते तो पुरता लढण्यासाठी आणि जिंकण्यासाठी शिक्षकच रहाणार आहेत. सुसंस्कार विरुद्ध माणसातल्या दुष्ट प्रवृत्ती असा

सामना. विवेक विरुद्ध हिंसेचा सामना. संस्कृती विरुद्ध जंगलीपणाचा सामना. कधीच न संपणारा सामना.

असा हा 'टु सर, विथ लव्ह' एक जुना तरी चांगला विषय घेऊन एका मोठ्या नटाच्या गरजाना पुरा पडू पहाणारा चित्रपट. सबकुछ पॉइशिए. त्याच्यापासूनच तो चालू होतो, त्याच्याभोवतीच रुंजी घालतो आणि त्याच्याशीच संपतो. एका अर्थी हा चित्रपट त्याचा केंद्रबिंदू सोडून मागेपुढे सरकतच नाही. त्यामुळे पॉइशिए या या गुणी नटाला प्रेक्षकांना पाहिले हे या चित्रपटापासून मिळणारे प्रमुख समाधान आणि अभिमानी. कारण वस्तुतः या चित्रपटाचा विषय अधिक मोलाचा आणि मूलभूत होता. तो या चित्रपटात काहीसा खुंटीसारखा वापरण्यात आला आहे; आणि त्यावर पॉइशिएची संपन्न गुणवत्ता निमित्तानिमित्ताने टांगण्यात आली आहे. या गुणवत्तेला काही न्याय मिळालेला नाही; विषयासंबंधी हाताळणीतल्या जुजबीपणामुळे आणि ढिसाळपणामुळे 'सर' चे व्यक्तिमत्त्व एकादा अविस्मरणीय आकार घेत नाही; ते देखील घेतलेले रहाते. पॉइशिएची अभिनयगुणांचे कौतुक आणि तरीही विलक्षण सहज असे दर्शन काय ते सातत्याने घडत रहाते आणि चित्रपट संपल्यावरही आठवतात ते या मोठ्या नटाचे पूर्वीचे अनेक चित्रपट.

एकाद्या नटासाठी हा चित्रपट असला तरी त्यात बाजूचा नटवर्ग देखील तसा पारखून घेतलेला आहे. लंडनच्या गरीब भागातली शाळा, तिच्यातली मुले, शिक्षक हा मेळ चित्रपट पुष्कळदा पटते. आपल्याकडल्या या प्रकारच्या शाळांची, त्यातल्या वांड, आडदांड मुलांची आणि भेदरलेल्या शिक्षकांची आठवण ते पदोपदी देते. तुलनेने काही वेळा वास्तव खोटते नाहीत ते खुद्द पॉइशिए सर. त्यांच्यातला 'हीरो' पुन्हा पुन्हा डोकावतो अभिनयात नव्हे, त्यांच्यासाठी बेतलेल्या घटनांत. त्यांचा 'सर' आपल्याकडल्या हिंदी-मराठी चित्रपटातून 'हीरो' जमातीला बेतून देण्यात येणाऱ्या प्रोफेसर, शिक्षक, इंजिनिअर, वैमानिक आदि तकलादू आणि जुजबी भूमिकांचे स्मरण अनेक जागी देतो. दोन तीन गाणी आल्यामुळे हे स्मरण आणखीच बळावते. म्युझिअमला 'सर' मुलांसकट भेट देतात त्या प्रसंगीचे गाणे तर तद्दन हिंदी सिच्युएशन निर्माण करते.

हे सारे असूनही हा चित्रपट अखेरपर्यंत बांधून ठेवतो. यातला श्रेयाचा सिंहाचा वाटा अर्थातच पॉइशिए यांचा. मोठ्या नटाच्या व्यक्तिमत्त्वातच एक अशी मोहिनी असते की ती नट समोर असेपर्यंत आपल्याला दुसरे काही सुचूच शकत नाही. हडसभडस बसका चेहरा, जाड ओठ, आखूड केस, काळा वर्ण, चिरेबंदी बांधा या साऱ्यानिशी पॉइशिए एकदा समोर आला की आपल्या मोजक्या, अचूक स्फोटक अभिनयाने काही क्षणातच अनेक ताण निर्माण करतो, आपल्यावर मंत्र टाकतो आणि मग काहीही आपण तास दीड तास पहात रहातो. उदाहरणार्थ हा चित्रपट.

□ □ □

# विचार धारे

समीर

## ◻ कंबोडियात काय होईल ?

अमेरिकेने कंबोडियात केलेला हस्तक्षेप सर्वथैव अयोग्य आहे असे ठामपणे मानणाऱ्या अमेरिकन कॉलेज–विद्यार्थ्यांनी तिकडे सबंध देशभर निषेधाची वावटळ उठविली आहे. या हस्तक्षेपातून काय फलनिष्पत्ती होईल याबद्दल एक तज्ज्ञ-मत परवा ऐकायला मिळाले. कानडामधील विंडसर (ओंटारियो) विश्वविद्यालयात राज्यशास्त्राचे प्राध्यापक असलेले प्रा. डेव्हिड बुर्फेल नुकतेच दिल्लीला भेट देऊन गेले, तेव्हा कंबोडियात काय होईल या प्रश्नाची चर्चा करताना ते म्हणाले :

' अमेरिकेने केलेला हस्तक्षेप निश्चित अपयशी ठरेल. कारण अमेरिकन तेथून निघून गेल्यावर पुन्हा व्हिएटकाँग तेथे जातील. या हस्तक्षेपामुळे लष्करीदृष्ट्या तात्पुरता फायदा झाला तरी राजकीय दृष्टया दीर्घकालीन तोटा होईल.' दक्षिण आशियातील परिस्थिती ज्याला माहीत आहे असा कोणीही माणूस हे सांग शकेल की या प्रदेशात साम्यवाद पसरू नये म्हणून केलेल्या हस्तक्षेपाचा उलटा परिणाम होईल. ' दोन महिन्यांपूर्वी मी म्हटले असते की साम्यवादाने कंबोडिया गिळंकृत करण्याचा संभव मुळीच नव्हता. पण आता अमेरिकन हस्तक्षेपामुळे ही शक्यता खूपच आहे. निक्सनला हे का समजत नाही हे मला कळत नाही. तो लष्करी विचारसरणीच्या आहारी गेलेला दिसतो.' अमेरिका व्हिएटकाँगचा कधीही पराभव करू शकणार नाही; कारण हा संघर्ष अमेरिकनांना वाटतो तसा लष्करी स्वरूपाचा नसून राजकीय आहे.

## ◻ कानडातील कॉलेज–विद्यार्थी

अमेरिकन व कानडियन विश्वविद्यालयांची तुलना करताना बुर्फेल म्हणाले : अमेरिकेशी तुलना करता कानडियन विश्वविद्यालयातले वातावरण बरेच शांत आहे. ' विश्वविद्यालयीन कारभारात निर्णय घेण्याचे कामी विद्यार्थ्यांना जबाबदारीचा वाटा देण्यात आम्ही अमेरिकेच्या बरेच पुढे आहोत.' शिवाय कानडियन कॉलेज–विद्यार्थी अमेरिकन विद्यार्थ्यांइतके राजकीय दृष्टया जागरूक नाहीत; पण याचे कारण अमेरिकन विद्यार्थ्यांच्या पुढे व्हिएटनामसारखी राजकीय समस्या प्रत्यक्ष त्यांच्या जीवनाशी निगडीत होऊन उभी आहे तशी एखादी राजकीय समस्या कानडियन विद्यार्थ्यांच्या पुढे उभी नाही.

## ¤ स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर फिजी

फिजी हा छोटेखानी देश येत्या ऑक्टोबरमध्ये स्वतंत्र होणार आहे. या देशाचे समाजकल्याण-मंत्री जोनाटी मव्होआ थोड्या दिवसापूर्वी दिल्लीला येऊन गेले तेव्हा त्यांनी माहिती दिली की सध्या स्वतंत्र फिजीची घटना तयार करण्याचे काम लंडनला चालू असून ती तयार झाली की पुढील वर्षी फिजीमध्ये सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येतील. फिजीतील समाज बहुवांशिक असल्याने नवीन पार्लमेंटमध्ये तद्देशीय फिजियनांसाठी २२ जागा, भारतीयांसाठी २२ जागा, व इतरांसाठी ८ जागा अशी एकूण ५२ जागांची तरतूद करण्यात आली आहे. सध्या फिजीच्या पार्लमेंटमध्ये ४० सदस्य आहेत. 'आमची नवीन घटना ब्रिटिश नमुन्यावर आधारण्यात येईल व आम्ही कॉमनवेल्थचे सभासद राहू.' फिजीची पहिली घटना १९२९ साली तयार करण्यात आली व १९६६ साली तिच्यात सुधारणा करण्यात आली. फिजीमध्ये दोन प्रमुख राजकीय पक्ष आहेत-अलायन्स पार्टी व नॅशनल फेडरेशन पार्टी.

'आमच्या देशात फक्त एकच सभासद असलेलाही पक्ष आहे. त्याचे नाव लिबरल पार्टी. या पक्षाचे सभासद 'अदृश्य' आहेत.' मूळचे भारतीय पण आता पूर्णतया फिजीयन झालले असे दीड लाख लोक फिजीत आहेत.

## ¤ नायजेरियातील वृत्तपत्र-स्वातंत्र्य

'डेली टाइम्स ऑफ नायजेरिया' या नायजेरियातील सर्वांत मोठ्या वर्तमानपत्राचे संचालक अल्हाजी जोसे भारतीय वृत्तव्यवसायाची पाहणी करण्यासाठी नुकतेच भारत-भेट देऊन गेले तेव्हा त्यांनी आपल्या देशातील वृत्तव्यवसायाची थोडीशी माहिती दिली :

नायजेरियातील लष्करी राजवट ही हुकूमशाही राजवट नाही. तिने वर्तमानपत्रांना संपूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. उलट वर्तमानपत्रे सरकारच्या दोषांवर बरीच टीका करतात. डेली टाइम्स तर सर्वांत अधिक टीका करतो. डेली टाइम्सचा खप १,४५,००० प्रती असून रविवारच्या आवृत्तीचा खप २,५२,००० प्रती आहे. मजकुरापैकी ४५ टक्के जागा जाहिरातींनी व्यापलेली असते. हे वर्तमानपत्र चालविणाऱ्या कंपनीत लंडनच्या 'डेली मिरर' वर्तमानपत्राची ४४ टक्के भागीदारी असली तरी बातम्या देण्याच्या तसेच मत प्रकट करण्याच्या बाबतीत डेली टाइम्स साधारणपणे जुन्या वळणाचा आहे. 'आम्ही 'सेक्स' व गुन्हे याचा बाजार मांडीत नाही.'

नायजेरिया व भारत यांच्या दरम्यान वृत्तपत्रीय क्षेत्रात अधिक सामंजस्य व सहकार्य असावे. या दोन देशांनी पत्रकारांची देवाण-घेवाण करावी. 'दोन्ही देशातील वृत्तपत्रांनी एकमेकांना राजकीय, आर्थिक व सामाजिक वार्तापत्रांची देवाण-घेवाण करावी. पण या बाबतीत सरकारी हस्तक्षेप नसावा. ¤ ¤ ¤

# उध्वस्त भिवंडी

प्रतिनिधी

मी भिवंडीला पोचलो तेव्हा दुपारचे तीन वाजायला आले होते. रखरखत्या उन्हात उध्वस्त भिवंडी भाजून निघत होती. जळलेली घरं दिसत होती आणि पोळलेली माणसं भेटत होती. कोणत्याही गल्लीत नजर टाकली तर, दंगलीच्या भेसूर खुणा दिसत होत्या. मानवतेवरच बलात्कार झाला आहे असं वाटत होतं. गावात शिरलो तेव्हा कर्फ्यू जारी होता. भीतीपोटी जन्मलेली स्तब्धता सर्वत्र होती. कोणी एखादा भिरभिरत्या, संशयित नजरेनं इकडे तिकडे पहात हळूच रस्त्यावरून जात होता. बंदुका घेतलेले पोलिस ठिकठिकाणी बाकावर ठाण मांडून बसले होते. काही चक्क झोपले होते तर काही गप्पा छाटीत होते. मध्येच एखादी काळपट-निळ्या रंगाची पोलिसांची व्हॅन आजूबाजूची शांतता चिरत जाताना दिसत होती.

डाक-बंगल्यावरून पुढे सरकलो तेव्हा एक कामगार भेटला. "साहेब जरा सांभाळा. समोर दिसते ना, ती सुलतान चाळ. तेथूनच दगड येतात म्हणे कधी कधी. त्यामुळे लोक या चाळीवरून जायला घाबरतो, तुम्ही जरा जपूनच जा."

जुनाट पण इस्लामी वळणाची ती इमारत होती. आत कोणीतरी रहात असावं, पण त्यावेळी मात्र ती अगदी प्रेतवत वाटत होती. तसाच पुढे गेलो. उजव्या बाजूला एक बैठी चाळ होती. बहुतेक सगळीच मुस्लिम कुटुंबे होती. दारावर गोणपाट किंवा चटयांचे पडदे होते. हळूच कोणीतरी या पडद्याआडून डोकावे. काही घरांच्या दारांना, खिडक्यांना जाळ्या होत्या. काही कुटुंबे या जाळ्यातून संशयी नजरेनं बाहेर पाहताना दिसत होती. अस्पष्टशी कुजबुजही ऐकू येत होती.

पहिल्या कोपऱ्यावरच दगडविटांचा नुसता खच दिसला. अर्धवट जळक्या भिंती आणि पॉवरलूमचे सांगाडे दिसत होते. एका फळविक्याची गाडी उलटी पडली

होती. काही खायला मिळेल अशा आशेने या ढिगाऱ्याला गाई हुंगत होत्या. भिवंडीत संचारबंदी चालू होती तरी जनावरांना त्याचे काय? गाई, शेळ्या मोकाट भटकत होत्या. गटाराच्या पाण्यात डुबणारी बदकेही दिसत होती. रस्त्यावर जागोजागी चिखल झालेला. दंगल सुरू झाल्या दिवसापासून ३–४ दिवस गावातले सगळे नळ खुले होते. त्यामुळे रस्त्यावर पाणीच पाणी झाले होते. काही काही रस्त्यावर दुर्गंधीही सुटली होती. बझारपेठ भागात चिखल झाला होता. बझारपेठ म्हणजे भिवंडीचा 'मिनी' लक्ष्मीरोडच म्हणा ना! दुतर्फा नाना दुकानांच्या रांगा असलेला हा छोटासा भाग. या बझारपेठेतील बव्हंशी मुस्लीमांची दुकाने अगदी वेचून खलास केलेली. कोठेही नजर टाकावी आणि अन्सारी किंवा शेख अशी नावे असलेल्या पाट्यांची, त्यांच्या दुकानांची, कचेरींची वाताहत दिसावी असा हा भाग. तेथेच एका पारावर बसून काहीजण सचित मुद्रेने विचार करीत होते, तर काहीजण समोर साचून राहिलेला कचरा काढीत होते.

तेथून ब्राह्मण आळीकडे जायला वळलो. उजव्या हाताला एक मशीद होती. बझारपेठेतील तीन नंबरची मशीद म्हणतात म्हणे तिला! या मशिदीची थोडीफार नासधूस केली होती. आत एक दगड शेंदूर फासून ठेवलेला होता. भगवा ध्वजही उभारला होता. मशिदीच्या बाहेर 'दगल्या मारुती' असं लिहून ठेवलं होतं. आतही काही ठिकाणी जय हनुमान असं लिहिलं होतं. डावीकडील भिंतीवर—

जय बली, जय बली। तोड दुश्मनकी नली

असं लिहिलेलं होतं. या भग्न मशिदीत आता सशस्त्र पोलिस पहारा करत होते. भिवंडीतील एका मशिदीची नासधूस झाली, व दोन हनुमान मंदिराचा पूर्ण विध्वंस करण्यात आला डॉ. आचार्य यांच्या बेचिराख झालेल्या दवाखान्यासमोरच एक हनुमान मंदिर होते. ते तर पूर्ण भस्मसात झाले होते. विटा-मातीचा नुसता खच तेथे साचलेला होता. मारुतीरायाची मूर्तीही दंगेखोरांनी जाळायचा प्रयत्न केला. भग्न मशिद व अर्धवट जळालेली हनुमानाची काळीठिक्कर पडलेली मूर्ती पाहून मन विषण्ण झालं. ही दोन्हीही दृश्ये हादरवून टाकणारी होती. माणुसकीवरचा विश्वास उडवायला लावणारी होती. दुसरे एक मारुती मंदिर तर म्हणे पार भुई-सपाट झालेलं आहे.

तसाच बेचैन मनाने ब्राह्मण आळीतील एका कार्यकर्त्याच्या घरात शिरलो. तो मजूर नेता होता. उभ्या भिवंडीला आग लागलेली त्याने आपल्या डोळ्यांनी पाहिली. गुरुवारी, (७ मे) शिवजयंतीदिनी जी मिरवणूक निघाली होती, तीत तो होता. जेव्हा दंगल भडकली तेव्हा हा सुद्धा एका छोट्या आघाडीवर हिंमत ठेवून होता, उभय जमातीच्या लोकांना साहाय्य करीत होता, कोणाच्या घरी स्फोटक द्रव्ये सापडली तर हा पंच म्हणूनही जात होता. त्यानं भिवंडीची सारी कर्मकथा जळजळत्या शब्दात ऐकवली.

भिवंडीला निजामपूर म्हणत. अजूनही तशा भिवंडी–निजामपूर पालिका अशा पाट्याही दिसतात. गावची वस्ती १ लाख १० हजार. त्यातले सुमारे ६० टक्के मुस्लीम व ४० टक्के हिंदू. म्हणजे या गावापुरते अल्पसंख्य हे हिंदूच ! पॉवरलूम हा भिवंडीचा आत्मा. गल्लोगल्ली पॉवरलूमचे छोटे-मोठे कारखाने. भिवंडी वाढली या पावरलूम्सच्या सोबतीनेच आणि आता गावठी बाँब गुंडाळायला भिवंडीकरांनी सूत वापरले ते या पॉवरलूममधलेच ! पॉवरलूमचा कारखाना उभारायचा आहे अशा नावानं म्हणे दगड आणले गेले व त्यांचा वापर अनेक शरीरे, घरे आणि मने रक्तबंबाळ करण्यासाठी केला गेला.

शिवजयंतीचा उत्सव भिवंडीत सुरू झाला १९५० च्या सुमारास. तानाजी व्यायाम शाळेने हा उपक्रम सुरू केला. तेव्हा अगदी छोट्या प्रमाणावर शिवजयंती साजरी व्हायची. श्री. अण्णा मिस्त्री (यांचंही घर दंगलीत बळी पडलं) पुढाकार घ्यायचे. एखादा चित्ररथ (फ्लोट) बनवायचे. सुरुवातीला ५–५० जण यायचे. छोटी मिरवणूक निघायची. पाकिस्तानी आक्रमणानंतर मात्र भिवंडीतल्या शिव-जयंती उत्सवाला जोर चढला. मोठी जोरदार मिरवणूक १९६६ साली प्रथम निघाली. १९६७ साली शिवजयंतीच्या मिरवणुकीवर निजामपुरा मशिदीतून दगड-फेक झाली. एक दिवसाचा जातीय उद्रेक झाला. काहींची डोकी फुटली. सुदैवाने कोणाचा बळी मात्र पडला नाही. या प्रकारानंतर ६८ व ६९ साली मिरवणूक निजामपुरा मशिदीवरून नेली जात नसे.

१९६७ सालानंतर एक शांतता समितीही नेमली गेली. भिवंडी नगरपालिकेचे अध्यक्ष हेच या समितीचे अध्यक्ष असत. ६९ साली काही जनसंघवादी लोकांनी

लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध।

डोंगरे बालामृत

के. टी. डोंगरे अ‍ॅण्ड कं. प्रा. लि. मुंबई-४.

निजामपुरा मशिदीवरून मिरवणूक गेली पाहिजे असा आग्रह धरला. तो मान्य झाला नाही. तेव्हा त्यांनी मिरवणुकीवर बहिष्कार टाकला होता.

यदा मात्र निजामपुरा मशिदीवरून मिरवणूक गेलीच पाहिजे असा आग्रह धरण्यात आला. १९ एप्रिलला शांतता समितीची बैठक होती. त्या आधी शांतता समितीच्या एकूण ८० सभासदांपैकी ३७ मुस्लिम सदस्यांनी एक निवेदन काढले. शांतता समितीचे अध्यक्ष (व नगराध्यक्ष) झुबेर पटेल हे मुस्लिम असल्याने त्यांचीही या पत्रकावर सही होती. "शिवजयंतीची मिरवणूक ज्या संघटनेतर्फे आयोजित केली जाते, त्या राष्ट्रीय उत्सव मंडळाने गेले वर्षभर जे वातावरण तप्त केले आहे, जो जातीय प्रचार चालविला आहे, तो लक्षात घेता असं वाटतं, की ही मिरवणूक निजामपुरा मशिदीवरून नेली जाऊ नये." असं या पत्रकात म्हटलेलं होतं. मिरवणुकीत घाणेरड्या घोषणा दिल्या जातात त्यांना प्रतिबंध करावा, भगवे झेंडे आणू नयेत, गुलाल उधळू नये अशाही अटी पत्रकात होत्या. १९ एप्रिलला जी शांतता समितीची बैठक भरली तिच्यावर अध्यक्ष पटेल यांच्यासह या ३७ मुस्लिम सदस्यांनी बहिष्कार टाकला. त्यांच्या निवेदनावर चर्चा व्हावी असा आग्रह काहींनी धरला. या सदस्यांना हे निवेदन मागे घ्यायला लावावे असे शेवटी बैठकीत ठरले.

२४ एप्रिलला शांतता समितीची पुन्हा बैठक भरली तेव्हा मात्र सर्व मुस्लिम सदस्य हजर होते. त्यांनी आपले निवेदन मागे घेतले. निजामपुरा मशिदीवरून मिरवणूक नेली जावी याला बैठकीत मान्यता देण्यात आली. आठ अधिकृत घोषणा निश्चित करण्यात आल्या. गुलाल कमी प्रमाणात उधळावा, मशिदीत टाकू नये असेही ठरले.

मिरवणुकीची तयारी केली जाऊ लागली. बझारपेठ भागात भगव्या पताका लावण्यात आल्या. कमानी उभ्या राहिल्या. सुतार आळी सुरू होते तेथे सुशोभित कमान उभारण्यात आली आणि एक तोफही ठेवण्यात आली. तेथेच खांबावर शिवप्रतिमाही लावण्यात आली.

शिवजयंतीच्या आधी विविध पक्षांच्या वक्त्यांची भाषणेही होत होती. इतिहासावर व्याख्याने देणाऱ्या पुण्याच्या एका प्राध्यापकाची आजूबाजूच्या खेड्यापाड्यातून बरीच भाषणे झाली. तामिरे मिल्लतच्या एका सदस्यानेही भाषणे केली म्हणे!

गुरुवार (७ मे रोजी), शिवजयंती दिनी मिरवणूक बरोबर दुपारी ३ वाजून २० मिनिटांनी सुरू झाली. ५ ते ७ हजार लोक मिरवणुकीत असावेत असा अंदाज आहे. या मिरवणुकीत आसपासच्या खेड्यातून सुमारे १५०० लोक पहिल्यादाच सामील झाले होते. मिरवणुकीतील ७०० लोकांकडे भगवे झेंडे होते असं मिरवणुकीतलाच कार्यकर्ता सांगतो. या झेंड्याच्या काठ्याचाच दंगलीत सर्रास वापर झाला. ठाणके आळीतून ब्राह्मण आळी, तेथून मदर छल्ला, सौदागर मोहल्ला या मार्गाने

मिरवणूक गेली. हिंदुस्तान मशिदीजवळून सुतार आळीकडे आणि मग हैदरी मशीदी-वरून मिरवणूक भोईवाड्याच्या पाठीमागे गेली. मच्छीमार्केटजवळ मिरवणूक आली तेव्हा पाठीकडच्या घरातून दगडाचा वर्षाव झाला. ॲसिड वल्बही फेकला गेला-आणि तेथून भिवंडीतील उभय जमातीची घरे व मालमत्ता गिळणारी ही महा-भयानक दंगल पेटली.

ही ठिणगी पेटण्याआधी मिरवणूक नीट चालली होती. अधिकृत घोषणा काही काळ दिल्या जात होत्या. 'हिंदु-मुस्लीम भाई भाई' अशा या घोषणा होत्या. हिंदुस्तान मशिदीपाशी आल्यावर मात्र काहींनी अश्लील घोषणा द्यावयास आरंभ केला असं सांगतात. 'जो हमसे टकरायेगा, मिट्टीमे मिल जायगा' या घोषणेबरोबर काही घाणेरड्या घोषणाही दिल्या जात होत्या असे काहींचे म्हणणे आहे. मिरव-णुकीत एकही स्त्री नव्हती. १५ मुस्लीम नेते होते पण ते मिरवणुकीत सामील झालेले नव्हते. मिरवणुकीच्या बाजूने ते चालले होते आणि मशीद आली की तेथे काही गडबड होऊ नये म्हणून दक्षता घेत होते.

ज्या निजामपुरा मशीदीवरून मिरवणूक जावी म्हणून आग्रह धरण्यात आला आणि मान्यताही मिळवण्यात आली, त्या निजामपुरा मशीदीपर्यंत मिरवणूक पोचलीच नाही. निजामपुरा मशीद येण्याच्या कितीतरी आधीच दंगल सुरू झाली. ५ वाजून ३५ मिनिटांनी दगडफेकीला आरंभ झाला. त्यावरोबर मिरवणूक पांगली. ज्या घरातून दगडफेक होत आहे असे वाटत होते त्या बाजूला जमाव धावत गेला. जेथे हे घडले तो मच्छी मार्केट भाग मुस्लीम वस्तीचा होता. मिरवणुकीबरोबर पाच-सहाशे पोलिस होते पण त्यांच्याकडे रायफली नव्हत्या. हे लाठीधारी पोलिस कमी पडले.

गावात एकदम घबराट उडाली. गोंधळ सुरू झाल्यापासून १० मिनिटांच्या आत चारीही दिशांना आगी लागायला सुरुवात झाली. खडकावर (मच्छी मार्केटपासून १॥ मैल), गौरीपाडा येथे (पाऊण मैलावर) आगी पेटल्या. सुतार आळीत सात घरे ज्वालांनी धडधडू लागली. डॉ. आचार्य यांच्या प्रसूतिगृहात बाळंतिणी होत्या. त्यांना बाहेर काढण्यात आले आणि ज्या ठिकाणी नवे जीव जन्मायचे त्या ठिकाण-चीच होळी करण्यात आली. समोरच हनुमान मंदिर होते. अशावेळी देवाशपथ देव आठवत नाही! मंदिर जमीनदोस्त करण्यात आले. डॉ. आचार्य यांच्या शजारीच कोनकर वकिलाचे घर. दंगलीने त्या घराचाही घास घेतला.

त्या दिवशीची भिवंडीतली रात्र विलक्षण होती. सगळा गावच धडधडा पेटल्यासारख्या दिसत होता. लपलप करीत ज्वाला आकाशाला भिडू पाहत होत्या. मध्यरात्री आकाश तांबडं, धुरकट होऊन गेलं. हे सारं पाहून ताऱ्यांनी देखील अश्रू ढाळले असले पाहिजेत.

रात्री १ वाजता पहिला बंब आग विझवायला आला. पण जेथे सबंध गाव

पेटलेले तेथे एक बंब काय पासंगाला पुरणार !

इकडे मिरवणुकीतले पुढचे लोक पळाले, पण मागचे हजार-दीड हजार लोक भोईवाड्याच्या तेथेच अडकून पडले.

गावात एकमेकाचे सूड घेणे सुरू झाले. अमक्याचा कारखाना जळाला म्हटल्या-वर तमक्याच्या कंपौंडला आग लावून देण्यात आली. हिंदु कामगारांच्या झोपड्या बेचिराख झाल्याचे कळताच कुणा मुस्लिमाच्या २ चाळी व १ कारखाना पेटवून देण्यात आला. बझारपेठेतील दुकाने रात्री लुटण्यात आली.

दुसऱ्या दिवशी म्हणजे ८ मे, शुक्रवारी दुपारनतर बदूकधारी पोलिस आले. भिवंडीची ठिणगी उडाली आणि जळगाव लगालीच पेटले. ठाणे, कल्याण, डोंबिवली आदि भागातही दंगलीचा विखार पसरला आणि आतापर्यंत १५६ जण दंगलीत ठार झाले.

जेथून मिरवणूक निघाली व ती ज्या मार्गाने मच्छी मार्केटपर्यंत गेली तो सगळा भाग मी हिंडलो. वरील माहिती देणारा कार्यकर्ता बरोबर होताच. जागोजाग भेसूर अवशेष पडलेले दिसत होते. दोन्हीही जमातींचं खूपच नुकसान झालेलं दृष्टीस पडत होतं. सुतार आळीच्या पुढे उजव्या हाताला मुरलीधराचं देऊळ आहे. तेथे सभा भरली होती. कोणाची किती हानी झाली याचा हिशेब चालला होता. सात्वन केले जात होते. या मुरलीधराच्या देवळासमोरच एक भले मोठे घर भस्मसात करून टाकलेले होते. त्या उजाड घराच्या साक्षीनेच मुरलीधर उभा होता. तेथून कुंभार आळी व बगालपुऱ्याच्या कॉर्नरवर गेलो. पुन्हा दृश्य तेच. आचार्य डॉक्टराच्या दवाखान्यापुढे अर्धवट जळालेली मोटार अजून तशीच होती.

तेथून मच्छी मार्केटकडे वळलो. पहिले दगड पडले ते येथेच. शेजारच्याच रस्त्यावर लतीफ मंझिल दिसत होते. मच्छी मार्केटमध्ये कोणीच नव्हतं. निर्मनुष्य गल्ल्या दिसत होत्या. बरोबर आठ दिवसापूर्वी येथे डोकी फुटली असतील, रक्त वाहिले असेल ही कल्पनाच अस्वस्थ करणारी होती. काही घराच्या दाराशी अजूनही गुलाल दिसत होता.

समोरच एक वाडा दिसला. दोन-चार मुस्लीम बाप्ये कठड्यावर बसून हलक्या आवाजात बोलत होते. त्याच्या नजरेत सशय होता. माझ्या बरोबरच्या कार्य-कर्त्याला त्यातल्या एकाने ओळखले. मग नजरेतला सशय गेला. मनं खुली झाली. 'यहाँ कुछ नही हुआ साब–' असं त्यातले काही सांगू लागले. चहाचा आग्रह करू लागले. पण वेळ नव्हता.

आभार मानून तसाच पुढे निघालो व बझारपेठेत पुन्हा शिरलो. या रस्त्यावरचे राष्ट्रीय उत्सव मंडळाचे फलक अजूनही तसेच होते. 'शिवजयंतीची मिरवणूक ७ मे रोजी दु. ३ वाजता निघणार आहे, तेव्हा हजारोंच्या संख्येने उपस्थित

रहावे ’ अशा आशयाचा मजकूर लिहिलेला होता. सर्व नागरिकांनी आपले सर्व व्यवहार १२ नंतर बंद ठेवावेत असाही आदेशवजा मजकूर होता. मात्र नंतर कोणीतरी या मजकुराखाली ‘ आपला, हिंदु ’ असे लिहिलेले होते.

पुन्हा भग्न घरे, भग्न मनांची माणसे परत परत भेटत होती. चालताना धुळी-बरोबर घरादारांची झालेली राखही उडत होती. समोरून एक उल्हासनगरचा सिंधी येत होता. कर्फ्यूचा पास घेऊन तो घाईघाईने चालला होता. भिवंडीला त्याची बेकरी होती. पण दंगलीने या निर्वासिताला पुन्हा निर्वासित केले होते.

तेथून इस्लामपुऱ्यात शिरलो. डाकबंगल्याच्या पिछाडीलाच हा भाग होता. येथे मात्र सगळं काही सुरळीत चाललं होतं. दंगलीची एकही खूण या भागात नव्हती. तेथल्या प्र. स. पक्षाच्या एका तरुण मुस्लीम नेत्याला गाठलं. त्यानं टाकलेल्या चटईवर बसून पाणी प्यालो. समोर मुले खुशाल खेळत होती. या भागात सुमारे ४–५ हजार मुस्लीम राहत असावेत. समोरच्याच बाजूला शे–दीडशे हिंदू राहतात. पण दोन्ही जमातीच्या सलोख्यानं काहीही घडलं नाही. इस्लामपुऱ्यात एक मशीदही आहे. तेथे नमाज पढणं चालू होतं. बाजूलाच पुनर्वसन केंद्र उभारलेलं होतं. ते पुनर्वसन केंद्र कसलं ? साधं गोणपाटाचं छत केलेलं. त्याच्याखाली अगतिक मुद्रेने दंगलग्रस्त बसलेले होते. डाकबंगल्यावरही दंगलग्रस्तांची अशीच अवस्था होती. राज्यपाल नबाब अलियावर जंग, मुख्यमंत्री वसंतराव नाईक या स्वाऱ्या डाक-बंगल्यावर आलेल्या होत्या. उभय जमातींचे प्रतिनिधी गाऱ्हाणी मांडत होते. राज्य-पाल महाशय पाईप ओढीत शांतपणे ऐकून घेत होते. त्यांच्या बेगम पंख्याने वारा घेत होत्या. मुख्यमंत्री नाईक लक्षपूर्वक तक्रारी ऐकत होते आणि काही बाबींचा तात्काळ निकालही लावीत होते.



कोठेतरी हलक्या आवाजातली बांग ऐकू येत होती. भिवंडी आधीच प्रेतवत वाटत होती आणि आता काळोखात तर तिचं व्यक्तित्वच नाहीसं झालं आहे असंच वाटत होते.

भिवंडीची दंगल पूर्वनियोजित होती का हा प्रश्न सारखा मनात उभा राहत होता. काहीजण छातीठोकपणे सांगत होते, की दंगलीची जय्यत तयारी झाली होती म्हणून ! उभय जमातींचीही तयारी होती असही काहींचे म्हणणे. भिवंडीत असा एकही कारखाना नाही की ज्याला ॲसिड लागतं. मग ॲसिड बल्ब आले कोठून ? 'मोलोटोव्ह कॉकटेल' बनविले कसे ? काही मुस्लीम कुटुंबे आधीच परगावी निघून गेली होती, कारण त्यांना काही विपरीत घडेल अशी कल्पना होती म्हणे ! नेहमी सात ते दहा तारखेपर्यंत रेशनिंग खरेदी करणाऱ्यानी आपले रेशनिंग पाच ते सात या दोन तीन दिवसात भरून ठेवले होते, असेही समजले. भिवडीत छापे घातले तेव्हा गावठी बॉबचे कितीतरी साहित्य सापडले ! दंगल पेटल्यावर दहा मिनिटाच्या आत दूरदूरच्या अंतरावरची घरे काही योजना असल्या-शिवाय पेटतात कशी ? असा प्रश्न काहीजण विचारत होते. गतवर्षी भिवंडीला शिवजयतीच्या मिरवणुकीत २ हजारांचा पोलिस बदोबस्त होता अस सांगतात. मग यदा काहीतरी प्रक्षोभक घडेल याची कुणकुण असतानाही अवघे ६०० पोलिस बंदोबस्ताला कसे ?

या सर्व प्रश्नांची उत्तरे न्यायमूर्ती मदन यांचे चौकशी मंडळ शोधील. तो आता त्यांच्या अखत्यारीतला प्रश्न आहे. या प्रश्नाची उत्तरे मिळतील, गुन्हेगार पकडले जातीलही. पण तरीदेखील काही मानवतेचे प्रश्न अनुत्तरितच राहतील. 'मजहब (धर्म) नही सिखाता, आपसमे बैर रखना' असं कवि इकबाल लिहून गेला पण ते प्रत्यक्ष आचरणात कितपत आलं ? हिंदू व मुस्लीम दोघांनीही आत्मशोध घेतला तर कदाचित या प्रश्नाची उत्तरे मिळतील.

नतर येणाऱ्या एकेक बातम्या भयानक होत्या. ठाण्याच्या पोलिसांना एक इसम सांगत होता की, 'माझ्या वडिलाना देवळातच गोळी घालून ठार मारलं !' खरं खोटं देवळातला देव जाणे ! आणखीही एक बातमी आली की अल्पसख्य जमा-तीच्या तिघांना तान्सा येथील ३०-३५ जणाच्या जमावाने ठार मारले आणि त्यांची प्रेते डोंगरात फेकून दिली !

हे सगळं पाहणं, वाचणं, ऐकणं कमालीचं अस्वस्थ बनवतं, मन बधीर करून टाकतं. काही केल्या उन्मळून पडलेल्या भिवडीच चित्र मनापुढून जात नाही. जिण्याची शरम वाटते आणि आपण अगतिक आहोत याची जाणीव आणखीच सुतकी बनवते.

□

# भिवंडीचे अर्थकारण

प्रतिनिधी

मुंबई-आग्रा रस्त्यावर असलेले हे शहर ठाण्यापासून दहा व कल्याणपासून सहा मैल अंतरावर वसलेले आहे. औद्योगिकदृष्टया पुढारलेले शहर असल्याने येथील नगरपालिका महाराष्ट्रातील नगरपालिकामध्ये 'श्रीमंत' गणली जाते. येथील हातमाग धंद्यासाठी आवश्यक असलेला कच्चा माल जो बाहेरून येतो त्यावरील रोजचा नगरपालिकेचा कर सुमारे आठ हजार रुपये जमा होतो. या छोटया नगरपालिकेचे या वर्षीचे अंदाजपत्रक सुमारे १ कोटी १० लक्ष रुपयांचे होते.

१९५६ सालापासून यंत्रमागावरील कापड–व्यवसाय मोठया प्रमाणावर सुरू झाला, त्यावेळी शहराची लोकसंख्या केवळ पंचवीस हजार एवढी होती; परंतु जसजशी या धंद्यातील प्रगती वाढू लागली तसतशी शहराची लोकसंख्याही वाढू लागली. १९६० ते १९६४ या चार वर्षांच्या काळात या धंद्याला फारच मोठया प्रमाणावर गती मिळाली व आज शहराची लोकसंख्या सुमारे सव्वा लाख आहे. यंत्रमाग व्यवसायात प्रथम मुसलमान बहुसंख्येने होते तर आज या धंद्यात हिंदूचे प्रमाण सुमारे ६५ टक्के झाले आहे.

भिवंडीतील या व्यवसायाचे वैशिष्टय म्हणजे यंत्रमागावर काम करणारा मजूरवर्ग. हा जवळजवळ ऐंशी टक्के बाहेरून (परप्रांतातून) आलेला आहे. मग तो हिंदु असो वा मुसलमान. शहरात सुमारे चाळीस हजार यंत्रमाग असून दोन पाळयामध्ये चाळीस हजार कामगार काम करतात. इतरत्र सर्वसाधारण कामगारांचे कामाचे तास आठ असतात; परंतु येथील यंत्रमाग कामगारांची एक पाळी मात्र बारा तासाची असते. कामगारवर्गात हिंदु कामगार हा आंध्र प्रदेश, तेलगण, खानदेश या भागातून आलेला दिसतो तर मुसलमान कामगार हा उत्तर प्रदेश, बनारस व काही प्रमाणात केरळमधून आलेला आहे.

यंत्रमागावर काम करणारे सुमारे दहा हजार कामगार व सायझिंग कारखान्यातून काम करणारे सुमारे दोन हजार असे बारा हजार कामगार आज बेकारीच्या

खाईत लोटले गेले. ज्या भिवंडीतील तरुणवर्गाला बेकारी हा शब्द माहीत नव्हता त्यांना आज दुसऱ्या दिवशीच्या भाकरीसाठी दारोदार हिंडावे लागणार आहे.

विविध कारखान्यातून काम करणारे कामगार हे दोन्ही जमातीचे होते. अनेक हिंदू मुसलमान कारखानदाराकडे तर मुसलमान हिंदू कारखानदारांकडे नोकरी करीत असत. परंतु आता दंगलीनंतर जे कारखाने जळाले नाहीत असे कारखाने जरी सुरू करावयाचे म्हटले तरी भितीपोटी कामगारवर्ग कामावर येईल किंवा नाही हीच धास्ती मालकांना वाटत आहे.

दंगलीत झालेल्या नुकसानीचे अनेक उलटसुलट आकडे बाहेर आले आहेत व येत आहेत. एक यंत्रमाग म्हटला म्हणजे त्याची किंमत सुमारे २६०० रुपये होते तर एक सायझिंग कारखाना म्हणजे २ लाख रुपये इतकी किंमत होते. असे सुमारे ५००० यंत्रमाग व २० सायझिंग कारखाने या दंगलीच्या भक्ष्यस्थानी पडले आहेत. शिवाय शहरातील गौरीपाडा, हुबसान आळी, म्युनिसिपल मटण मार्केट, सुतार आळी, भोईवाडा, खडक, मदरसल्ला, सौदागर मोहल्ला, एस. टी. डेपो नजीकची झोपडपट्टी अशी कित्येक घरे, तसेच दुकाने, वाहने या सर्वांच्या नुकसानीची बेरीज केल्यास हा आकडा सुमारे तीन कोटी रुपयांपर्यंत जाईल असे वाटते. दंगलीतील मृतांचा आकडाही जो वृत्तपत्रातून आलेला आहे त्यापेक्षा बराच मोठा असावा असे येथे सर्वत्र बोलले जाते. शहरातील कारखान्यांची नुकसानी झाली त्याच बरोबर या दंगलीचा अप्रत्यक्ष परिणाम अनेक क्षेत्रात होणार आहे. या कारखान्यांना आवश्यक असलेली यंत्रसामुग्री तयार करून देणाऱ्या लेथवर्कशॉप्सना या पुढे फारच कमी काम मिळणार आहे. मोठ्या प्रमाणावर तयार होत असलेल्या कच्च्या मालाची ने आण करण्यासाठी सुमारे ५० ते ७५ ट्रक्स येथे दररोज काम करीत असत; परंतु त्यांनाही यापुढे काम मिळणार नाही.

यंत्रमाग कारखान्यांना आवश्यक असणारे सायझिंग मटेरियल व डायीग मटेरियल हे मुंबईतील सूतबाजार व वडगादी या भागातून आणले जाते. प्रथमतः हा माल बऱ्याचवेळा रोखीने आणला जात असे. परंतु पुढे पुढे सूत कारखानदाराचे व व्यापाऱ्याचे नेहमीचे संबध येऊ लागल्याने भिवंडीतील कारखानदारांची बाजारपेठेत पत वाढू लागली व त्यामुळे व्यापारीवर्ग ज्या कारखानदाराची बाजारात पत आहे अशाला चाळीस टक्के क्रेडीट देऊ लागला. या व्यापाऱ्यांनी क्रेडीटवर दिलेला सुमारे १ कोटी ५० लक्ष रुपयांचा माल भिवंडीतील कारखानदारांकडे आहे. यातील अनेक कारखाने जळून खाक झाल्याकारणाने व्यापारीवर्ग चिंतातूर बनला आहे.

## पुनर्वसन

भिवंडीतील दंगलग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी महाराष्ट्र राज्याचे पुरवठा मंत्री ना. भाऊसाहेब वर्तक यांच्या अध्यक्षतेखाली तेवीस जणांची पुनर्वसन समिती नियुक्त

करण्यात आली असून, या समितीच्याद्वारे शहरातील दंगलग्रस्तांचे पुनर्वसन शक्यतो लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे सरकारी अधिकाऱ्यांनी जाहीर केले आहे. कित्येक कामगाराच्या झोपड्या जळून खाक झाल्या असल्याने त्यांना पावसाळ्यापूर्वी निवाऱ्याची सोय करून देणे ही आज तातडीची गरज आहे.

पुनर्वसन करताना शहरात पुन्हा गलिच्छ वस्त्या निर्माण होऊ नयेत याकरिता नवीन चांगल्या वसाहती उभारण्यासाठी भिवंडीपासून दीड मैल अंतरावर नागाव येथे पंधरा एकर जमीन सरकारने दिली असून त्या जागेवर सुमारे दहा हजार कुटुंबांची सोय सरकार करणार आहे. या जागेजवळच मुंबई महापालिकेची वॉटर लाईन आली असल्याने पाण्याचा प्रश्न फारसा उद्भवणार नाही. ही जागा शक्यतो पावसाळ्यापूर्वी बांधून व्हावी यासाठी युद्धपातळीवरून हे काम हाताळण्याचा सरकारने घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. ही सरकारी योजना प्रत्यक्षात उतरो हीच इच्छा! अन्यथा सरकारच्या अनेक बाबतीत दिसून येणारा आरंभशूरपणा इथेही नडायचा! पावसाळ्यापूर्वी १० हजार गाळे तयार करण्याची योजना सरकारी प्रवक्त्याने बोलून दाखविली खरी; परंतु दंगलग्रस्त मात्र, ती प्रत्यक्षात कितपत उतरेल याविषयी साशंकच आहेत. सरकारला हेच एक आव्हान ठरणार आहे.


मानवाचा जागतिक विक्रम
आयुर्वेदाचा जंगी पराक्रम।
कितीही झाला अतिसार
"मस्कीनॉल"ने होई पसार।

"मस्कीनॉल"

आमांश (पोटात कळ अगर मुरडा होऊन शौचास होणे) रक्तातिसार (शौचातून रक्त पडणे) हगवण, जुलाब, उलटी, कॉलेरा यांवर वनस्पतींचे अनुभवसिद्ध प्रभावी औषध.

मस्कीन फार्मा, मुंबई नं. ७

दंगलीमुळे खरोखर निराधार झालेल्या लोकांनाच पुनर्वसनाच्या योजनेचा लाभ मिळावा यासाठी सरकारला जागरूक रहावयास पाहिजे. अनेकदा ग्रस्त एक आणि मदत भलत्यालाच असे प्रकार झालेले दिसतात. त्याची पुनरावृत्ती टाळण्याचा प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे निराश्रित झालेले असंख्य लोक गाव सोडून निघून गेले आहेत. सरकारने पुनर्वसनाचे कार्य सुरू केले आहे हे त्यांना कोण सांगणार ? गरीब, अशिक्षित, अज्ञाणी लोक, मजुरी सुटली म्हणून कटोरी हातात घेऊन ठाणे, कल्याण, मुंबईच्या मार्गास लागले. त्यांना सरकारी योजना कशी कळणार ? की फक्त शिबिरात जेवणारे तेवढेच निर्वासित सरकाच्या दफ्तरी ठरणार ?

प्रश्न आहे तो हजारो मैल पसरलेल्या आणि ५५ कोटी लोकसंख्या असलेल्या देशात कुठेही कोपऱ्यात गेलेला नेमका भिवंडीचा दंगलग्रस्त शोधून त्याचे जीवन पुन्हा उभारण्यास मदत करण्याचा. हे आव्हान सरकारने स्वीकारलेले आहे असे समजते. पुनर्वसन समिती या साऱ्या गोष्टी विचारात घेऊनच आपल्या योजना आखीत असावी. मात्र यावेळी एक सूचना करावीशी वाटते. ती म्हणजे पुनर्वसनाच्या कार्यासाठी लागणारे मजूर आणि नोकरवर्ग यासाठी दंगलग्रस्तांनाच प्राधान्य द्यावे. जेणेकरून त्यांना आजपासूनच पोटासाठी श्रम करून काही मिळविल्याचे समाधान मिळेल. व ज्या आत्मीयतेने झटपट काम उरकण्याची महत्त्वाकांक्षा शासन बाळगते तेवढ्याच पोटतिडिकीने पूर्ण करणारा सेवकवर्ग उपलब्ध होईल.

त्या दृष्टीने ज्यांचे नुकसान झाले आहे अशा कारखानदारांना महाराष्ट्र राज्य अर्थ महामंडळाचे प्रत्येकी सोळा हजार रुपयांपर्यंत कर्ज देण्याची योजना आखली आहे ती स्वागतार्हच म्हटली पाहिजे. शिवाय या कर्जावरील व्याजाचा दर ९ टक्के असला तरी कर्ज घेणाऱ्याला ६॥ टक्के दरानेच व्याज भरावे लागणार आहे. २॥ टक्के व्याज शासन अर्थ महामंडळाला देणार आहे. शिवाय पहिली दोन वर्षे कर्जाचा हप्ता द्यावयाचा नाही ही महामंडळाने दिलेली सवलतहि कारखानदारांना आपला उद्योग सुस्थापित करण्यास मोठा हातभार लावणार आहे.

अर्थ महामंडळाप्रमाणेच स्टेट बँकेने १ कोटी रुपयांचे कर्ज देण्याची योजना आखली आहे. १४ बँकाचे आता राष्ट्रीयीकरण झाले असल्यामुळे शासनाने सर्व बँकांना स्टेट बँकेचे अनुकरण करण्याची सूचना दिल्यास पुनर्वसनाचे कार्य सुकर होईल.

अशा रीतीने धनाचा प्रश्न सुटला तर तन म्हणजे परिश्रमाचा प्रश्न सुटणे भारतात तरी कठीण जाण्याचे कारण नाही. शिवाय दंगलग्रस्त स्वतः या कामी शारीरिक परिश्रम करण्यास तयार होतील. प्रश्न राहिला तो मनाचा ! म्हणजे काम जिद्दीने उरकण्याचा ! परंतु त्या बाबतीत शासनाने आखलेली महत्त्वाकांक्षी योजनाच पुरेशी बोलकी आहे. ◻

# मुंबईतील पहिली दंगल आणि बंद

रतनलाल भंडारी

परवा सहज वाचता वाचता मुंबईच्या इतिहासाबद्दल अद्भूत माहितीने भरलेला 'मुबईचे वर्णन' हा ग्रंथ वाचला. ग्रंथ श्री. गोविंद नारायण यांनी लिहिला असून तो १८६३ साली प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यातील मुबईतील पहिल्या जातीय दंग्याची माहिती व 'बद'ची माहिती कुठलीही टिप्पणी न करता माणूसच्या वाचकासाठी सादर करीत आहे.

'सन १८५१ ऑक्टोबर महिन्याच्या सत्राव्या तारखेस ह्या शहरात सकाळचे दहा वाजता मुसलमान लोकांचा मोठा दंगा झाला. ह्याचे कारण असे सांगतात की, चित्रज्ञानदर्पण नावाचे वर्तमानपत्र एक पारशी छापीत असे. त्यात दरखेपेस तो अनेक लोकांतील नामांकित पुरुषाची चित्रे काढून त्याचा वृत्तातही छापी. एके खेपेस त्याने मुसलमान लोकांचा पैगबर महमद याचे चित्र शिलाछापावर छापून त्याचा थोडा वृत्तांत लिहिला. जे महमदाचे चित्र काढिले होते ते सुरेख व अवयव शुद्ध नसून त्याच्या एका डोळयावर शाईचा बोळा असल्यामुळे तो एका डोळयाने अंध आहे असे दिसे. हे चित्र कोणी बुद्धया नेऊन शुक्रवारी सकाळच्या प्रहरी मार्किटांत जुमामशिद आहे तिच्या दरवाजावर चिकटवून दिले. जेव्हा मशिदीतून निमाज पढून मुसलमान लोक सुमारे दोन प्रहरचे अकरा वाजता बाहेर पडले तेव्हा त्यांच्या दृष्टीस हे वेडेविद्रे चित्र पडले.'

'हे पाहून त्यास आवेश आला की हे कोणी पारशाने आपल्या पैगंबराची हेळणा करायास चिकटवून दिले आहे तर आपण त्याचा सूड उगवावा. असा निश्चय करून शेकडो मुसलमान 'दीन दीन' म्हणत मोठ्या आरोळ्या ठोकीत हातात सोटे घेऊन पारशी लोकांचा सूड घेण्यास निघाले आणि रस्त्यात पारशी सापडेल

त्यास मारीत सुटले व कित्येक दुसरे लोकही जखमी झाले व मेले. कांपाच्या मैदानात एक दोन पुर्तुगीज लोक जखमी झाले. हे लोक पोलिसचे शिपायास देखील आटोपेनातसे झाले. बाजारात लूटालूट होऊ लागली. सराफ लोकांनी आपल्या पेढ्या बंद केल्या व जिकडे तिकडे पळापळ सुटली. पारशी लोक तर फारच घाबरून गेले. कित्येक आपआपल्या घरी जाऊन कवाडे लावून दडून राहिले. ह्या मुसलमान लोकाच्या जागो जागी टोळी फिरू लागल्या. शहरचे कोतवाल यांनी फार प्रयत्न केले तरी हा दगा थड होईना. मग पलटणीचे लोक आणून जागोजाग ठेवले व पोलिसचे शिपायाची सख्या वाढविले. मार्किटातील चौकीपासी पलटणीची एक तुकडी सतत एक महिना होती. अशी याची ही मारहाण व दगा सतत एक महिनापर्यंत चालला होता. ह्या दिवसात मुले माणसे व बायका रस्त्यातून जायास फार भीत. पारशी लोकाची तर पाचावर धारण बसली होती '

## ...समेट असा झाला

'पारशी व मुसलमान लोकाचे वैमनस्य एक वर्षपर्यंत चालले होते. वर्षभर मारामाऱ्या व दगे होत नसत. तरी पारशी लोक मुसलमानांच्या मोहल्यांतून जाण्यास धजत नसत. पुढे दुसऱ्या वर्षी पोलिस कमिशनर, सरकतारी लम्सडन व दुसरे नामांकित सरकारी हुद्देवाले मिळून मुसलमान व पारशी लोकाची सभा मिळवली. त्यांत मुसलमान लोकाचा काजी व दुसरे मुख्य असामी होते. याप्रमाणे पारशी व मुसलमान लोकाचे सख्य करून दिले. ज्याने हे चित्र छापविले होते त्याजकडून क्षमा मागविली. त्याने हा अपराध कबूल केला व ही गोष्ट गैरसमजुतीनी झाली असे सागितले. तेव्हापासून हा कज्जा मिटून मुसलमान व पार्शी लोकाची एकी झाली.'

'ज्या दिवशी पारशी आणि मुसलमान लोकाचे समेट झाले त्या दिवशी सध्याकाळचे कित्येक नामांकित पारशी आणि मुसलमान गृहस्थ गाडयांत बसून मुसलमान लोकाच्या मोहल्यातून फिरावयास निघाले होते. त्यांची रचना अशी होती. दर-गाडीत एक दोन पारशी, दोघे मुसलमान व एकादा इंग्रज कामगार असे गाडीत बसून एक दोन मुख्य रस्ते फिरून आले.'

'याविषयी ज्ञानोदयांत याप्रमाणे लिहले आहे. 'चित्रज्ञानदर्पण या नावाच्या एका गुजराथी वर्तमान पत्रांत महंमदाचे चित्र काढून त्याचा वृतांत लिहिला आणि ते चित्र काही एकांनी मुसलमानाच्या मशिदीपाशी चिकटविले. त्यावरून कांही अज्ञानी मुसलमान लोकाना वाटले की, आमच्या पैगंबराची हेळणा पारशी लोकांनी आरंभली आहे असा द्वेष धरून त्यानी पारशी लोकाशी तुफान आरंभिले. हल्ली पंधरा दिवसापासून येथे मोठा गवगवा चालला आहे; दोन तीन वेळ मुसलमान व पारशी यांची मारामारी झाली. चित्रज्ञानदर्पणवाला यावर काही दोष आहे असे नाही. त्याने महंमदाचा वृत्तांत इंग्लिश पुस्तकावरून काढीला व चित्रही याप्रमाणे काढिले. आणि असे करावयास त्यास अधिकारही आहे. त्याने

निदा बनावन दोषाने लिहले असते तर त्यास शिक्षा देणे प्राप्त होती, परंतु त्याने असे केले दिसत नाही. धर्मावरुन लोकांस शिव्यागाळी, दुरूत्तरे छापणे हे वाईट आहे. आणि जे असे करितात त्यांस शिक्षाच केली पाहिजे. परंतु यावरुन मारामारी करणे हा फारच मोठा अन्याय आहे. कोणाला ज्या गोष्टीविषयी वाईट वाटते, त्याने सरकारपाशी फिर्याद करावी म्हणजे सरकार चौकशी करुन योग्य ठराव करील. जे मारामारी करितात त्यांचे चालेल असे नाही. उलटी त्याची फजिती होते व सरकार त्यांस मोठी शिक्षा देईल.

'हल्ली सर्व लोकांनी विचार करावा की, जर यावेळेस मुसलमान सरकार असते तर पारशी वगैरेचे कसे झाले असते ? परंतु हे सुज्ञ व निःपक्षपाती सरकार आहे, म्हणून परमेश्वराचे उपकार मानून आनंद करावा व या सरकाऱ्च्या अनुकूलतेने वागावे'

## बंद

'मुंबईत काही वर्षामागे एक सधन सरकारी इंग्रज कामगार कुत्रा चाऊन मेला. त्याने मरते समयी सरकारांत पुष्कळ द्रव्य ठेऊन असा अर्ज केला की, मुंबई शहरांत जी रस्तोरस्ती कुत्री फिरुन लोकांस उपद्रव करितात व येणाऱ्या जाणाऱ्याच्या अंगावर धावून जातात, त्यांस प्रतिवर्षी आपल्या अनामत ठेवलेल्या द्रव्याचे जे व्याज येईल ते खर्च करुन मारुन टाकावी. ह्याप्रमाणे ही वहीवाट पुष्कळ वर्षे चालत आली !

...सन १८३२ जून महिन्याचे सातवे तारखेस पारशी लोकांनी मुबईत हरताळ पाडून मोठा दंगा केला. त्यांचे कारण असे सांगतात की, पूर्व दिवशी कुत्रेमारू लोकांनी कोटांतील पारशी वाड्यांत शिरुन कित्येक गृहस्थांचे ओटीवरील कुत्रे धरून नेले. त्यावेळी पारशी लोकानी त्यास सागितले की, तुम्ही करू नका व असे कुत्रे धरणे सरकारी कायद्या विरुद्ध आहे. तर जी कुत्री धरियली आहेत ती सोडून द्या. परंतु त्यानी ऐकून न घेता कुत्रे घेऊन चालते झाले. त्यावेळी पारशाची व त्यांची थोडी लटापटी झाली !

'नंतर आसपासचे शेपन्नास पारशी जमून असा कट केला की, जून महिन्याचे सात तारखेस मुबईतील दाण्यादुण्याची वगैरे सर्व दुकाने बंद करुन हरताळ पाडावा. आणि इंग्रज लोकाचे खाणे बंद होईल असे करावे. अशी मसलत करून त्यांनी कोटातील व कोटाबाहेरील बाजारच्या लोकास मसलत देऊन तयार केले. परंतु यामध्ये एक गोष्ट संतोषाची होती की, श्रीमत पारशी लोक यात नव्हते व त्यांस ह्या गोष्टीची माहिती देखील नव्हती. ह्या दंग्यात पारशी लोकांचे बबरजी, पाणके आदिकरून बहुतेक हलक्या प्रतीचे लोक असून पाच पंचवीस मध्यम प्रतीचे गृहस्थ होते.'

'ह्या दिवशी त्यांनी बाजार बंद करून सोल्जर व इतर इंग्रज लोकास रोटी व पाव कुलाब्यास जात होते ते बद केले. कित्येक खाटकी लोक यांस अनुकूल नव्हते, ते मास घेऊन जात असता त्यास मारून त्याकडचे मास घेऊन कोटाच्या चरात टाकून दिले. किरिस्ताव लोक पाव घेऊन जात होते, त्याचे पाव रस्त्यांत फेकून देऊन हाकून लाविले. याप्रमाणे त्यांनी सकाळपासून दहा अकरा वाजत तोपर्यंत धिंगा-मस्ती चालविली. हे पाहून इग्रज लोकांस मोठी दहशत प्राप्त झाली. माजिस्त्रेटाने टौनमेजरास लिहून पाठविले की, पारशी लोकानी दंगा माडिला आहे, तर त्याचा बंदोवस्त करावयास काही लष्कर पाठवून द्यावे. परंतु पुष्कळवेळ पर्यंत त्याने तसे केले नाही. कुलाब्यास गोरी पलटण होती तीस खाणे पोहोचायचे होते ते पोहोचले नाही. इग्रज लोकांच्या गाड्या हापिसात जात होत्या त्यास अटकाव करू लागले. कित्येक हापिसे उघडूच दिली नाहीत. याप्रमाणे यानी धुमाळी माडली होती. सुप्रीम कोर्टातील मुख्य न्यायाधिश सर जान आद्री हे त्या रस्त्याने कचेरीस जात होते, त्यांच्या गाडीस अडविले आणि रस्त्यातील कचरा व एक दोन मेलेल्या घुमी त्यांच्या गाडीत फेकून दिल्या. असा त्यांनी अनर्थ माडीला.'

'मग मॅजिस्त्रेटाने कित्येकांस धरून कैद केले. जमशेटजी जिजीभाई व दुसऱ्या प्रख्यात पारशी गृहस्थास याचा बदोबस्त करण्याविषयी सांगून पाठविले. त्यांनीही यास शांत करण्याचे उपाय योजिले, पण जे अडाणी लोक आपल्या गुरमीत होते ते शुद्धीवर येईनात.'

'मग टौन मेजर यांनी कुलाब्याहून दोन तीन वाजताना गोऱ्या लोकांची पलटण आणून उभी केली. अशा मसलतीने की, तसा प्रसंग गुजरला असता बार सोडण्याचा हुकूम करावा. त्याचा हा निर्धार पाहून पारशाची टोळी विस्कळीत पडत चालली. मग त्यांची जूट फुटली आणि हळूहळू जिकडे तिकडे पळू लागले. त्यामध्ये कित्येक बळकट व पहिलवान होते, परतु शेपन्नास गोऱ्यांपुढे गरीब बापुडे होऊन गेले. नंतर त्यातील कित्येकास धरून कैद केले. त्यात कोणास दोन, कोणास तीन वर्षांच्या टेपी देऊन शिक्षा केली. ह्या दंग्यात काहीं खून झाला नाही ही एक गोष्ट पारशी लोकांच्या दंग्यात सांगाया जोगी आहे, ह्या दंग्यामुळे पुष्कळवर्षेपर्यंत पारशी लोकांविषयी इंग्रज लोक थोडे विरुद्ध होते. परंतु त्यांत संभवित व सुशिक्षित लोकांचे (प्रमाण) बिलकूल नव्हते व ते ह्या दंगा करणाऱ्या पारशी लोकाशी फार विरुद्ध होते—असी जेव्हा इंग्रज सरकारची पक्की खात्री झाली तेव्हा त्यांची समजूत पटली. मग पूर्व-वत किंवा जाजती सरकारची त्याजवर प्रीति बसली.'

'हल्ली रस्त्यांत सांपडतील ते कुत्रे धरून टाकण्यासाठी बैलाच्या गाडीवर मोठे लोखडाचे पिंजरे केले आहेत. त्यात घालून त्यास नेऊन पांजरपोळात कोंडून ठेवितात.'

□ □ □



# आली ती होती कोण ?

३१ डिसेंबरची रात्र !

घड्याळात बरोबर बाराचे टोल पडले !

जुन्या वर्षाची सरती घटिका आणि नव्या वर्षाची उगवती आशादायी घटिका ! अपूर्व मिलन झाले होतें त्या क्षणाला !

दूर कुठेतरी चर्चची घंटा ठणठणली...! ठण् ऽऽ ! ठण् ऽऽ !! ठण् ऽऽऽ !!!

डिसोझाच्या घरी खूप मित्रमंडळी जमली होती पार्टीला. पार्टीत नुकताच रंग भरू लागला होता. सर्वजण खातपीत होते. कोपऱ्यातल्या रेडिओग्रामवर 'कम सप्टेंबर'ची धून वाजत होती. सर्वजण आनंदाने बेहोष झालेले होते.

"अरे, बारा वाजले." कुणीतरी म्हणाले.

"काय बारा वाजले ?" दुसऱ्याने विचारले.

"होय ! घंटा नाही का ऐकू येत ?" पहिला उद्गारला.

"मग नवीन वर्ष आलं ! हॅपी न्यू ईयर !" चिमणीच्या चिवचिवाटासारख्या आवाजात एकजण म्हणाली.

डिसोझा उभे राहिले. त्यांनी रेडिओग्रामकडे हात केला व ते म्हणाले. "जरा वेळ बंद करा बघू." एकजण झटकन् पुढे झाला व त्याने रेडिओग्राम बंद केला.

"जरा वेळ शांत रहा." डिसोझा म्हणाले.

"आता बारा वाजले आहेत. ती पहा चर्चची घंटा ऐकू येत आहे. आपण सर्व शांतपणे उभे राहू आणि नवीन वर्षाच्या आगमनाप्रीत्यर्थ प्रार्थना करू"

सर्वजण शांतपणे उभे राहिले. डिसोझा प्रार्थना म्हणू लागले...नवीन वर्षाची स्तुतीपर, आशादायी प्रार्थना !

प्रार्थना चालू असतानाच एक तरुण मुलगी हळूच आत आली आणि एका कोपऱ्यात बसली.

प्रार्थना संपली.

"वुईश यू ऑल हॅपी न्यू ईयर !" डिसोझा जोरात म्हणाले.

"हॅपी न्यू ईयर !"

---

**हा पहा माझा कोट...माझाच.**
**काल रात्री मी तिच्या अंगावर तो घातला होता...**
**आणि त्यात...**

## विजयानंद बर्फे

---

आणि सगळीकडे शुभेच्छाची व हस्तांदोलनाची खैरात उडाली.

"म्युझिक...! कम ऑन, स्टार्ट द म्युझिक !" कुणी तरी ओरडले.

पुन: रेडिओग्राम वाजू लागला. नवीन ट्विस्टची धून...स्वराची आलापी...जोष ...जल्लोष !

तरुणांच्या अंगात जोष संचारला. हळूच एक एक जोडी मधल्या मोकळ्या जागेत नृत्यासाठी येऊ लागली.

नृत्य सुरू झाले. सर्वांच्या अंगात नवीन वर्ष संचारले होते. जोड्या बेभान होऊन नाचत होत्या.

ती तरुणी कोपऱ्यातल्या टेबलावर एकटीच बसली होती. तिच्याकडे कुणाचेच

■■ युरोपचे सांस्कृतिक नेतृत्व
करणारा कलासक्त देश

■■ ब्रिटिशांशी साम्राज्यसत्तेच्या
बाबतीत स्पर्धा करणारा
महत्त्वाकांक्षी देश

■■ स्वातंत्र्य, समता आणि बंधुता
या तत्त्वत्रयींचा पुकारा
करणारा ध्येयवादी देश

फ्रान्सची ही विविध रूपे आहेत.
परंतु त्यापेक्षाही फ्रान्सचे आणखी
एक रूप आहे ते राजकीय
अभ्यासकांना गोंधळात टाकणारे.
वास्तव परिस्थिती आणि
प्रत्यक्ष दर्शन
यात फ्रान्सइतकी विसंगती
दुसरीकडे कोठेच आढळत नाही.

■■ प्रशियाच्या तडाख्यांनी घायाळ झालेला फ्रान्स
तिसऱ्या प्रजासत्ताकाच्या रूपाने पुन्हा उभा राहिला.

■■ आता सारे काही स्थिरावले असे भासू लागते तोच
पहिल्या महायुद्धाचा भडका उडाला. त्यातून फ्रान्स
बाहेर पडला – विजयातील भागीदार म्हणून

■■ नंतर शांततेचे फसवे पर्व सुरू झाले आहे हे फ्रान्सला
उमगलेच नाही. त्याचा परिणाम असा झाला की न
लढताच पॅरिसवर पाढरे निशाण फडकले.

■■ एका बड्या राष्ट्राच्या नामुष्कीची ही परिसीमा होती.

■■ दुसरे महायुद्ध संपले अन् फ्रान्समध्ये लोकशाहीचा
खेळ सुरू झाला. मंत्रिमंडळामागून मत्रिमंडळे कोसळू लागली.

■■ दिएन बिएन फू येथल्या लढाईत तर आशियाई
स्वातंत्र्यसैनिकांनी या देशाची ससेहोलपट केली.

■■ ही सारी परिस्थिती बदलून टाकण्यासाठी समर्थ,
आग्रही आणि कार्यक्षम नेतृत्वाची गरज होती.
म्हणूनच साऱ्या फ्रान्सने द गॉल यांना आवाहन केले.

■■ त्या एका माणसाने अकरा वर्षांच्या कालावधीत
फ्रान्सचे नवे रूप जगास दाखविले.

■■ हे सारे चढउतार, जयपराजय का घडले, कसे घडले, घडविले कोणी
आणि बिघडविले कोणी हे जाणून घेणे अतिशय उद्बोधक ठरेल.

अन् म्हणून

फ्रान्सच्या गेल्या शंभर वर्षांतील राजकीय इतिहासाचा आलेख
रेखणारी लेखमाला

# पराजित-अपराजित

पुढील अंकापासून सुरू होत आहे.

**लेखक : वि. स. वाळिंबे**

लक्ष नव्हते. सर्वजण आपआपल्या नादात होते. तीही त्या जल्लोषाकडे शून्य दृष्टीने पहात होती.

डिसोझा व त्याची पत्नी मेरी त्या खोलीमध्ये इतरांना खायला प्यायला आग्रह करीत फिरत होते. इतक्यात मेरीची नजर कोपऱ्यात बसलेल्या त्या तरुणीकडे गेली.

"अँथनी, डियर !" मेरी डिसोझाजवळ जाऊन त्याच्या कानात कुजबुजली. "ते पहा ती कोण नवीन पाहुणी आलीय....पाहिलीस का ?"

"कुठंय ?"

"ती काय त्या कोपऱ्यात एकटीच बसली आहे !"

"अरे, हो की !"

"जा बर. ती एकटीच दिसते. तिला थोडावेळ कंपनी दे: तिला काय पाहिजे ते विचार."

"ओ ऽऽ यस्स्. डार्लिंग !"

मेरी पुनः आतल्या खोलीत गेली. आणि डिसोझा त्या तरुणीजवळ गेला.

"मी बसू का इथं ?" डिसोझाने विचारले.

"हो, बसा की" इतके बोलून ती तरुणी पुन्हा शांत बसली.

"माझं नाव डिसोझा. अँथनी डिसोझा ! ही जी पार्टी चालली आहे ना नवीन वर्षाची ती मी माझ्या मित्रमैत्रीणींना देत आहे."

"अस्स ऽऽ !"

"पण तू...तू मात्र नवीन दिसतेस ?"

"माझं नाव रोज...रोजमेरी फर्नांडीस. आपली व माझी ओळखसुद्धा नाही. तरीपण मी आत आले म्हणून क्षमा मागते !"

"क्षमा कसली मागतेस ? आज आनंदाचा दिवस आहे. सर्वांनी मिळून आनद करावयाचा असतो. तू आलीस म्हणून मला आनंद वाटतो."

"त्याचं असं झालं, दार उघडं दिसले. संगीताचा आवाज ऐकू आला म्हणून मी आत आले. तशी पूर्वी मी इथं नेहमी यायचे. माझा मित्र इथं राहायचा. तुम्ही इथं नवीनच आला आहात वाटतं ?"

"होय ना. झाले सात आठ महिने आम्हाला इथं येऊन."

रोज आता जरा खुशीत आली होती.

"माझा मित्र दरवर्षी नवीन वर्षाच्या आदल्या रात्री पार्टी करायचा. खूप मजा यायची. मी खप डान्स करायचे....नाचायचे....बेहोष होऊन जायचे."

"चला तर मग आताही तुला डान्स करायला हरकत नाही. मी देतो तुला कंपनी. येतेस का डान्स करायला ?" डिसोझाने उठून तिचा हात हातात घेतला. तो त्याला थंडगार लागला.

" नको, नको, " आपला हात सोडवून घेत रोज म्हणाली. डॉक्टरने मनाई केली आहे डान्स बिलकूल करायचा नाही म्हणून. सॉरी !...म्हणन तर मी इकडे बरेच दिवसात आले नाही. "

" तुझा हात किती थंड आहे ! थंडीनं तू अगदी गारठली आहेस. "

" तसं काही नाही..."

" तसं कसं काही नाही " तिला बोलू न देताच डिसोझा म्हणाला. " हा कोट घाल ! थंडी बाधेल तुला " ती नको नको म्हणत असता डिसोझाने तिच्या अंगावर आपला कोट घातला.

" तुझ्यासाठी मी काही तरी गरम पेय घेऊन येतो. "

" मला काही नको. रात्रीचं मी काहीच घेत नसतें. "

पार्टीला रंग चढला होता. सगीताने वातावरण धुंद झाले होते. नृत्याचा जोष क्षणाक्षणाला वाढत होता. जोड्या बेहोष होऊन नाचत होत्या...खाणारे खात होते. पिणारे पीत होते.

" तू कुठं राहतेस ?"

" मी ?..." ती जराशी अडखळली. " मी...वांद्र्याला राहते. पाली हीलवर..."

" पाली हील...म्हणजे कुठं ?"

" तिथंच...!"

" म्हणजे ऽ..."

" जरा फादर ग्रेस कुठं राहतात विचारले तर कुणीही सांगेल. त्यांच्या घरापासून चवथं घर माझं !"

रोज त्रोटक उत्तरे देत होती. डिसोझाने जास्त प्रश्न विचारू नये असं तिला वाटत होतं. बोलताना सुद्धा तिच्या स्वरांत नाराजी होती, विषय बदलण्याच्या उद्देशाने ती म्हणाली,

" बरीच थंडी पडली आहे नाही ?"

पण इतक्यात कुणीतरी हाक मारल्यामुळे तिची परवानगी घेऊन डिसोझा उठून गेले. तिला फार बरे वाटले. सुटकेचा निःश्वास टाकला तिने !

दुरून कठून तरी तीनचे टोल ऐकू आले. तिने चमकून भिंतीवरील घड्याळाकडे पाहिले.

' आता मला गेलंच पाहिजे.' ती स्वत.शीच पुटपुटली व जायला म्हणून उठली. इतक्यात डिसोझा परत तिच्याजवळ आले. तिने पुनः घड्याळाकडे पाहिले.

" फार वेळ झाला का ? घरी जायचंय ?"

" हो, आता मला गेलच पाहिजे, जाते मी."

" थांब !...मी येतो पोचवायला."

" नको ..मी एकटीच जाईन !"

" इतक्या रात्रीचं ? एकटी जाशील तू ?"

" हो ! ...त्यात काय झालं ? कोण खाणार आहे मला ?"

" खाणार तर कुणी नाही, पण...? जाशील कशी ?"

" कशी म्हणजे ?...आले तशी जाईन !"

" मला तसं म्हणायचं नव्हतं ! ...बरं हरकत नाहीं. मी टॅक्सी बोलावतो... नाही तर माझा मित्र मार्टीन तुला त्याच्या कारमधून पोहचवील."

" नको...नको...! मी पायीच जाईन !"

" इतक्या लांब पायी ? वेड तर लागलं नाहीं ना ?"

" बरं ! बाथरूम कुठं आहे ? मला जरा तोंडावरून पाणी फिरवायचं आहे."

" चल मी दाखवतो."

डिसोझाने तिला बाथरूम दाखवली. ती आत गेली व तिने दरवाजा लावून घेतला. डिसोझा त्या बंद दाराकडे पहातच राहिला. त्याला काही तरी विचित्रच वाटत होते. तो पुन: दिवाणखान्यात आला. संगीत बरसत होते पण शांतपणे. नाच-



णारे थकून बसले होते. त्यांच्या आपसात गप्पा चालल्या होत्या. दोघं तिघं जण तर तेथेच कोचवर आडवे झाले होते.

बराच वेळ झाला. डिसोझाला कसला तरी संशय आला. तो बाथरूमकडे गेला. दरवाजा बंदच होता. तो तेथेच थांबला. आणखी पाच मिनिटे निघून गेली. डिसोझा दाराजवळ जाऊन कानोसा घेऊ लागला. आत शांत होते. कसलाही आवाज ऐकू येत नव्हता—पाण्याचासुद्धा नाही !

अजून पाच मिनिटे निघून गेली.

डिसोझाला कसला तरी संशय आला. त्याने हाक मारली, " रोज ऽऽ !... रोजी ऽऽ !"

आतून उत्तर आले नाही. कसलीही हालचाल ऐकू आली नाही. तो जोरजोराने दार ठोठावून हाका मारू लागला.

" रोज...! रोज ऽऽ ! !"

जोरजोराने दार ठोठावल्याचा आवाज व त्या हाका ऐकून सर्वजण धावत आले.

" काय झालं ॲंथनी ?"

" व्हॉट हॅपन्ड ?"

" एक मुलगी तोंड धुवायला म्हणून आत गेली, अर्धातास झाला पण ती बाहेर येईना. आतून कसलाही आवाज येत नाही."

" कोण आहे ती ?"

" नवखीच होती..."

" चक्कर येऊन बेहोष तर झाली नाही ना ?"

दोघेजण पुढे होऊन दाराला धडका देऊ लागले. पण दार उघडले नाही. एकाने धावत जाऊन खुर्ची आणली. खुर्चीवर उभे राहून त्याने दारावरची झडप उघडून आत डोकावून पाहिले. आत कुणीच नव्हते.

" आत कुणीच नाही..."

" कोणी नाही ?"

" हात आत घालून बोल्ट तर काढ."

दार उघडले गेले, ॲंथनी आत गेला. त्याच्यामागे इतरही शिरले. आत कुणीच नव्हते. त्या तरुणीच्या अस्तित्वाची कसलीच खूण नव्हती तेथे !

" मी स्वत: आत शिरताना पाहिले तिला. मीच तिला इथं आणल. मग कुठं गेली ती ?"

" कोण होती ती ?"

" मघाशीच सांगितलं ना की मी तिला ओळखत नाही. आज प्रथमच मी तिला पाहिलं."

" चोर तर नव्हती ?"

" आज काल कुणाचा भरवसा राहिला नाही."

" अरे माझा कोट ? माझा कोट घेऊन गेली ती !"

" कसला कोट ?"

" कसा घेऊन गेली ?"

" मेरीनं सांगितलं म्हणून मी तिच्याकडे गेलो " अँथनी म्हणाला.

" होना !" मेरी म्हणाली, " मी तिला एकटीच बसलेली पाहिलं. अँथनीला म्हटलं तिला कंपनी दे."

" मी तिची ओळख करून घेतली. बराच वेळ बोलत बसलो. दिसायला सालस दिसत होती. पण स्वत:बद्दल बोलायला मात्र नाराज दिसत होती. नाचायला चल म्हणून मी तिचा हात हातात घेतला, पण तो बर्फासारखा थंड वाटला. तिला खूप थंडी वाजत होती. म्हणून मी तिला माझा कोट घालायला दिला. पण तोच कोट ती घेऊन गेली."

" तिचा पत्ता माहीत आहे का ?"

" पाली हील...वांद्र्याला रहाते ती. फादर ग्रेसच्या बंगल्याजवळ कुठं तरी रहाते ती."

" उद्या जाऊन चौकशी करा."

" तसंच करायला हवं !"

दुसऱ्या दिवशी डिसोझा फादर ग्रेसच्या बंगल्यावर गेले. सकाळची वेळ होती. फादर बागेला पाणी घालीत होते.

" गुडमॉर्निंग फादर."

" गुडमॉर्निंग !" फादरने वर पाहिले. " अरे वा ऽ,–डिसोझा तुम्ही ? इतक्या सकाळी काय काम काढलं ?"

" एक गोष्ट विचारायला आलोय."

" विचारा की." फादर झाडाला पाणी घालीत म्हणाले.

" फादर तुम्ही रोज फर्नांडीसला ओळखता ?"

" कोण रोज फर्नांडीस ?" फादरने थांबून विचारले.

" ती इथेच जवळपास रहाते. जराशी बुटगेली आहे. गव्हाळी रंगाची, गोल चेहऱ्याची ! अठरा-एकोणीस वय असेल तिच."

" हा ऽऽ ! हा ऽऽ ! रोजी ऽ ! आठवलं. मग काय झालं ? कशाला ?"

" ती कुठं रहाते ?"

" इथून चवथ्या बंगल्यात रहात होती."

" रहात होती ?" डिसोझाने आश्चर्याने विचारले.

" हो, रहात होती ! पण तिला मरून तीन वर्षं झाली. गोड मुलगी होती."

" मरून तीन वर्षे झाली ?" डिसोझा आश्चर्यचकीत झाला होता. " ते शक्य

नाही ! हे शक्य कसं होईल ? ती मेली नाही. काल रात्री ती माझ्या घरी आली होती. माझ्या इथं पार्टी होती. ती म्हणाली संगीताचा आवाज ऐकून मी आले. आम्ही जवळजवळच बसलो होतो. बोललो होतो."

"ती कुणीतरी दुसरी असेल."

"पण तिनं नाव रोजमेरी फर्नांडीस सांगितलं. म्हणाली की मी फादर ग्रेसच्या शेजारीच रहाते. तिला संगीताची, डान्सची फार आवड होती. मला म्हणाली की डान्समध्ये भाग घेता येणार नाही कारण डॉक्टरने मनाई केली आहे."

"तुम्ही सांगता ते सर्व खरं आहे. पण हे कसं शक्य आहे ? ती जिवंत नाही. तिला नृत्यसंगीताची खूप आवड होती. डॉक्टरने मनाई केली असतानासुद्धा ती नवीन वर्षाच्या आदल्या दिवशी तिच्या मित्राच्या घरी पार्टीला गेली. तेथे खूप नाचली. तो ताण तिला सहन झाला नाही. नाचता नाचताच ती हार्टफेल होऊन मरण पावली. गॉड ब्लेस हर सोल ! ...आज बरोबर तीन वर्षं झाली ह्या गोष्टीला.

"मग ती काल रात्री माझ्या इथं कशी आली होती ?"

"मीच तिच्या मृत्यूनंतर उपासना चालविली. तुम्हाला तिची कबर पहायची आहे ?"

"चला, पहायची आहे."

फादरने हातातील झारी तेथेच ठेवली व ते जवळच चर्चयार्डमध्ये असलेल्या कबरींकडे गेले.

"त्या तिथं, त्या गुलमोहरीच्या झाडाखाली तिची कबर आहे. तिच्या बापा- शेजारीच तिला पुरलेलं आहे,...पुअर सोलऽ !"

ते दोघेही कबरेजवळ गेले. तोच डिसोझाच्या तोंडून एक चित्कार बाहेर पडला.

"काय झालं ?" फादरने घाबरून विचारले.

"हा पहा माझा कोट....माझाच कोट आहे. हाच कोट मी रात्री तिला थंडी वाजत होती म्हणन तिच्या अंगावर घातला होता. त्याच्या खिशात माझं पैशाचं पाकीटही असेल !"

फादर ग्रेस अवाक् होऊन कबरीवर पसरलेल्या त्या कोटाकडे पहात होते.



# रसगुल्ले आणि बॉम्बस् !

## दादूमिया

### पाच

आपल्याकडे बामणबामणेतर हा नाजूक विषय जसा आपल्या समाजकल्यांना संत्रस्त करतो तसाच हिंदू-मुसलमान प्रश्न पश्चिम बंगालमध्ये पुढाऱ्यांना सतावतो. बहुसंख्य सुशिक्षित बंगाली हिंदू प्रो–मुस्लीम आहेत असे हमीद दलवायांना आढळून आले, त्याचे कारण मी शोधून काढले. प्रोग्रेसिव्ह दाखविण्यासाठी प्रो-मुस्लीम व्हावेच लागते आजकाल, असे मला आढळून आले. आधुनिक साहित्यिक होण्यासाठी ज्याप्रमाणे जयवंत दळवींच्या 'चक्र' मागे जावे लागते त्याप्रमाणे !

त्याउलट पूर्व बंगालमधील मसलमान सुशिक्षित झाला की प्रोग्रेसिव्ह आहे हे दाखविण्यासाठी प्रो–हिंदू होतो ! पहिल्यादा तो हिंदू पत्नी स्वीकारतो, नंतर मुला-मुलींची नावे हिंदू नावाशी मिळतीजुळती ठेवतो व नतर इस्लामचा विरोधी होतो ! उदाहरणार्थ, तो आपल्या मुलीचे नाव जमिला ठेवतो. जमिला, रमिला, प्रमिला, उर्मिला–किती सारखी नावे आहेत, नाही का ? आता त्याचे आर्ग्यूमेंट पहा : 'जमिला हे नाव अरबी आहे, इस्लामी नव्हे. जगात इस्लामी म्हणून काही जन्माला आलेच नाही. सारे पूर्वी होते, पुढे परिस्थितीमुळे ते इस्लामी झाले. पण अरबी नावे बदललेली नाहीत. भारतीय हिंदूंनी मुस्लीम धर्म स्वीकारला असला तरी जुनी हिंदू नावे बदलण्याचे काय कारण ?'

लक्षात ठेवा, हे विचार पाकिस्तानी मुसलमानी तरुण पिढीचे आहेत, जनसंघी व सभावाल्यांचे नव्हे.

हे विचार या लेखात माडण्याचे काही प्रयोजन ?

पूर्व व पश्चिम बगाल जवळजवळ एक आहेत. दोघांची भाषा, संस्कृती व विचारसरणी एक आहे. जनसघाने काही अरबी स्कॉलर्स तयार करून मानिसक बदल (ब्रेनवॉशिंग) करण्याचे काम हाती घेतले, तर त्यास फार मोठे यश येणार आहे. 'ऑर्गनायझर'मध्ये इस्लामी रूढीवर लिहिणारे श्री. जलानी हे मुसलमान गृहस्थ त्या खटपटीत आहेत.

Man proposes and God disposes अशी इंग्रजीत एक म्हण आहे. बगालच्या राजकारणात प्रोग्रेसिव्ह व पॉलीटीकल God साऱ्या उत्तम, एकात्मता साधणाऱ्या कल्पनांचा चक्काचूर करतो हे या देशाचे दुर्दैव आहे. या फटवर आपण पाकिस्तानशी चाललेले हे गेल्या हजार वर्षाचे युद्ध जिंकले तर काय मौज उडेल ?

पण तसे होणे नाही.

माझ्या अमेरिकन व रशियन मित्रांना मी 'Pakistan invaded India' असे म्हणताच दया येई. त्यांच्या नजरेत चीड, राग, दया व द्वेष याचे अजब मिश्रण मला आढळून येई. त्यांच्या नजरा मला जणू विचारीत, 'शरम नाही वाटत असे शब्द म्हणायला ? पाकिस्तान केवढे, भारत केवढा. खरं म्हणजे पाकिस्तानास तुमची सतत भीती वाटावयास पाहिजे !'

किंग्स्ले मार्टीन् या प्रसिद्ध पत्रकाराचे शब्दच मी तुमच्यासमोर माडतो :

"When India and Pakistan first parted company, the idea was that they should have a common army and foreign policy. Many of us were optimistic in those days, because, inspite of the horrors in which both countries were involved in 1947, we thought that economic advantage would prove more powerful than nationalist ambition. It never occured to us that you would not co-operate economically, build hydro-electric power plants which would improve the irrigation of both countries, have a customs-free frontier and spend your wealth (which goodness knows, was not too ample) on mutual aid, instead of peevishly rearming against each other. I am still bewildered about the origin of this animosity."

या पूर्वेकडील विभागात तीन वड्या राष्ट्रांना तीन निरनिराळ्या चिजा पाहिजे आहेत :

१. चीनला कलकत्ता बदर पाहिजे आहे. त्यामुळे थेट ऑस्ट्रेलियापर्यंत सागरी ताबा राहून चीनचे पूर्वेस अबाधित साम्राज्य पसरू शकेल. त्याचप्रमाणे चीनला

तेलाची जरूर फार आहे. चिनी धूर्त नजर अतिपूर्वेस इंडोनेशियाकडे व जरा अलीकडे आसामातील तेलावर आहे.

२. अमेरीकेस व ब्रिटनला आसामातील तेलाचे उत्पन्न आपल्या खिशात पूर्वीप्रमाणेच पडत राहवे ही तळमळ लागून राहिली आहे. कलकत्यास जास्तीत जास्त ब्रिटीश पेढ्या आहेत. त्यांचा East of Suez बालेकिल्ला कलकत्ताच. बंगालला आसामातील फिझोचे भगतगण आपल्या बाजूने शह देतील हे त्याचे गणित कितपत बरोबर निघते ते आता बघायचे आहे.

जमीनदारांचा जे लोक दिवसाढवळ्या खून पाडतात त्यांना फादर्स व मदर्स यांची का भीती वाटणार आहे ?

३. रशियास सारेच पाहिजे आहे. चीनच्या वाढत्या साम्राज्यवादास आळा घालणे, हिंदी महासागरावर ताबा मिळविणे व पूर्व गोलार्धात रशियन Influence प्रस्थापित करणे हे सध्या रशियन राजकारण्यांचे धोरण आढळते. रशियन राजकीय चाल नेहमीच वक्र असते. त्यामुळे सध्या इंदिराजीस आपल्या खिशात घालून हे ध्येय जिंकणे अशी त्यांची Strategy दिसत आहे.

त्यास हिंसाचाराने उत्तर देऊन रशियन influence खलास करणे, बंडखोरी करून आपले प्रभुत्व येथे स्थापन करणे व मार्क्सिस्टांच्या मदतीने येथे आपले राज्य चालविणे अशी महत्त्वाकांक्षा सध्या पेकींगमध्ये आढळून येत आहे.

बंगाल व आसाम वेगळा करणे ही कम्युनिस्टांची व पाकिस्तानची पहिली पायरी दिसते आहे. आसाममध्ये म्हणून त्यानी ' आम्हास आणखी एक वेगळी रीफायनरी द्या ' ही मागणी उचलून धरली आहे. तेवढ्यासाठी लोकांच्या मोर्चास व घेरावला केवढा आर्थिक व नैतिक पाठिंबा दिला जात आहे ! आसाम वेगळा झाला की ही सारी संपत्ती आपल्याला आपोआप गट्ट करता येईल असे त्याचे गणित आहे. हे समजावून देणारे, राष्ट्रहितासाठी मार खाणारे बंगाली सुशिक्षित म्हणून आसामात नकोत. कम्युनिस्ट असले तरीही !

खरे म्हणजे दुसऱ्या रीफायनरीची गरज काय ? गोहत्तीच्या रीफायनरीची ७,५०,००० टनाची कपॅसिटी आहे ती अकरा लक्षांवर वाढविता का येणार नाही ?

त्यासाठी वीस लाख टनाच्या वेगळ्या रीफायनरीची काय गरज ?

सध्या गोहत्ती व बरौनी येथील रीफायनरीसाठी पुरेसे तेल आसामात सापडते. पुढील पाच वर्षात गेलेकी व रुद्रसागर आणि लकवा येथील विहीरी खूप तेल देणार आहेत. त्यासाठी दिगबोईच्या छोट्या युनिट्स्चे एक्स्पान्शन् करता येणार नाही काय ?

कच्छप्रमाणे आसामात औद्योगीकरण पुरेसे झालेले नाही हे खरे आहे. पण स्थानिक निष्ठा विचारात घ्यावयास नकोत काय ? कम्युनिस्टानी याचा विचार करायचे म्हणा कारण काय ? त्यांच्यामुळे आसामात अर्ध्या लाख विद्यार्थ्यांनी

उगीचच सत्याग्रहात भाग घेतला व हिंसाचार आणि दहशतवादास उत्तेजन दिले. हे का ? तर म्हणे तिसऱ्या रीफायनरीत नोकऱ्यांची संधी वाढेल म्हणून.

या नोकऱ्यासाठी जागा किती आहेत, माहीत आहे ? फक्त ४५०.

पण आमचे सरकारही विचित्रच आहे. अगदी पहिल्यादा फिझोस डोक्यावर बसवून ठेवले. नतर बंगाली हिंदूना ठार करण्यासाठी उद्युक्त झालेल्या पाकिस्तानी मुसलमानांना वसाहत करण्याची संधी देऊ केली. त्याच्यानतर पाळी आली मारवाडी व इतर व्यापारी मंडळीवर ? त्यानतर फकरुद्दीन अली महंमदास दिल्लीत प्रमोशन मिळाले. त्याने पाकिस्तान्यांना आसामात खुले परवाने दिले ! त्यानंतर आज राजकृपा कम्युनिस्टांवर आहे. त्यानी तेथे अंदाधुंदीस प्रोत्साहन देणे चालविले आहे. एकात्मता भुगारून देण्याचे मनावर घेतले आहे.

त्यांना आर्थिक विषमताच दूर करावयाची असेल तर किती मार्ग मोकळे आहेत. लहान लहान हायड्रो इलेक्ट्रीक प्रोजेक्टस् सुरू करून उत्तर व्हिएटनाम-प्रमाणे खेडोखेडी तांदुळाच्या गिरण्या, रेशमाचे गृहोद्योगी कारखाने, लाकडाचे कारखाने, फळांचे पॅकबंद डबे तयार करण्याचे कारखाने वगैरे लघुउद्योगांना राजाश्रय सरकारमार्फत मिळावा. पण कम्युनिस्टांची दृष्टी 'फाळणीनतर'च्या फळावर आहे. या लहान उद्योगातून त्यांना चीनसाठी काय निष्पन्न होणार ?

म्हणून त्याचे सध्या 'आवो प्यार करेंगे'चे राजकारण जोरात चालले आहे.

या कम्युनिस्टांच्या चाळयांना तोंड कोण देऊ शकेल याचा विचार केल्याशिवाय हा लेख पुरा होऊ शकणार नाही.

काँग्रेसवाले आऊट ऑफ क्वेश्चन् ! पूर्वेकडे काँग्रेसवाल्याचे नाव फारच खराब आहे. तुम्ही गाधी टोपी चढविली तर पोलीस तुम्हास स्मगलर्स म्हणून समजतील व अटक करतील व इतर लोक काँग्रेसवाले दरोडेखोर समजून तुम्हास मारपिटाई करतील. दुसऱ्या युद्धकाळी बगालच्या दुष्काळात धान्य दडवून ठेवणारे एकजात काँग्रेसवाले होते, काळाबाजार करणारे सारे काँग्रेसवाले होते, लाचलुचपत देणारे व घेणारे सारे काँग्रेसवाले होते,मध्यमवर्गाच्या सुशिक्षित मुली एका नाईटला शभर रुपये देऊन खरेदी करणारे हरामखोर काँग्रेसवाले होते, सुभाषबाबूचे नाव ब्लॅक् आऊट् करणारे काँग्रेसवाले होते, 'वदे मातरम्'ला मान्यता न देणारे काँग्रेसवाले होते –

तुम्हालाच घृणा आली ना ?

मग 'शोनार बांगलाच्या'च्या सुपुत्राना त्यांच्याविरुद्ध द्वेष, राग व घृणा असली तर त्यात आश्चर्य काय ?

म्हणून प्रथमच सागितले, काँग्रेसवाले ? Out of question –

राहिले समाजवादी.

त्यात पी. एस. पी. च्या सनदशीर नेमस्तना बंगालमध्ये वावच नाही. फर्नांडीस-

लिमयांप्रमाणे मार खाणे त्याना जमणार नाही. म्हणून ते आपले राजकारणात मार खाणे पसत करतात. सब्लाईम् लव्हप्रमाणे मार खाणेदेखील शारीरिक नसावे, मानसिक ठीक आहे !

एस. एस. पी. म्हणजे लोहीयाचे वंशज. कम्युनिस्ट मोठी पाती तर एस. एस. पी. छोटी. आत्यंतिक प्रेम द्यावे व घ्यावे हा याचा खाक्या. दुर्दैवाने, बगालमध्ये कम्युनिस्टानी याच्यासाठी काही ठेवलेच नाही करण्यासाठी. स्टेनलेस ब्लेड्स् उद्या पाच पाच पैशाला एक एक मिळू लागल्या तर 'भारत' किंवा तत्सम ब्लेडला हात कोण लावेल ? एस. एस. पी. व कम्युनिस्ट याच्या संबधात तेच म्हणता येईल. जनतेची स्थिती एक नायक व दोन् नायिका याच्यासारखी आहे. एस. एस. पी. जे जे देऊ शकेल ते सारे कम्युनिस्ट देऊ शकतात, मात्र कम्युनिस्ट जे जे देतात ते ते सारेच एस. एस. पी. स देणे शक्य नाही. जनसघ–हिंदुसभा याचीही हीच स्पर्धा चालू आहे. दोन्ही नायिकाना तर एकदम स्वीकारणे शक्य नाही. म्हणून Survival of the fittest.

मधू लिमये मात्र म्हणतात, समाजवादी लोकांनी कम्युनिस्टाच्या 'सत्ता' देण्याच्या किंवा भागीदार बनवू पाहण्याच्या खेळात (गेम) स्वत:स बळी पडू दिले. ते ही आपली चूक झाली हेही प्रांजलपणे कबूल करतात.

पण दुसरा रस्ता कोणता होता नाहीतर ?

मध्यप्रदेशात जनसघासारखा तत्त्वनिष्ठ मोहराही बळी पडलाच ना या सत्तेच्या खेळात ?

खुद्द 'ऑर्गनायझर'मध्येही त्यावरून केवढी पत्रापत्री झाली होती !


जनसघ ही 'ए पार्टी टू वॉच्' आहे यात शकाच नाही. सघ व जनसघात फरक आहे असे म्हणणे–

खैर, छोड दो.

तसे म्हणण्यात काही फायदा असला तर आपण उगीच का चिंता करावी ?

माझी चिंता वेगळी आहे.

सघाचे कार्य केरळात किंवा बंगालमध्ये पाहिजे तेवढे नाही याची मला नेहमीच खंत वाटते. संघामुळे सस्कारक्षम वयात मुलांना एक प्रकारची शिस्त लागते, चारित्र्यसंपन्नता वाढीस लागते व संघटनेची आवश्यकता कळत नकळत पटू लागते. हे तीन मोठे फायदे संस्कारक्षम वयात एकदा झाले की त्याचा परिणाम साऱ्या जीवनभर रहातो, माणूस त्यातून बाहेर येणे अवघड आहे. पंजाब, महाराष्ट्र, मध्य-प्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान येथे या चागल्या परिणामाचे दृश्य मी माझ्या डोळ्यानी पाहिले आहे. त्याउलट मद्रास, त्रिवेंद्रम किंवा कलकत्ता येथे जवळजवळ शून्य दिसणारे सघाचे कार्य माझ्या मनास पीडा देते. साम्यवाद तेथे म्हणून पसरू शकला असे मला वाटते. केरळ व मद्रास येथे प्रत्यक्ष कार्य विशेष घडूच शकले नाही. पण




# घडीघडीला जमते रंगत, कोका-कोलाची जर संगत

स्वच्छंदपणे हिंडण्याफिरण्यात आनंद तर खराच, पण तो अधिकच वाढतो कोका-कोलाच्या संगतीत! कोका-कोलाचा स्वाद असा रुचकर नि उत्साहदायक असतो की, पुन्हा पुन्हा कोका-कोलाच प्यावासा वाटतो. जगभर कुठेहि पहा, केव्हाहि पहा, कोका-कोला पिणाऱ्यांची संख्या वाढतेच आहे. वाहवा! कोका-कोला, अशी लज्जत एरवी कुठून मिळणार?

Enjoy Coca-Cola

कोका-कोला, हा कोका-कोला कंपनीचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे.

CMCC-16-162 MR

कलकत्ता ? ती तर डॉ. हेडगेवारांची कर्मभूमी ! शिक्षणभूमी ! गुरुजी गोळवलकरांचे बरेच वास्तव्य येथे होते ! तरीही कलकत्त्यास संघाचे कार्य काहीही नसावे ?

याची चर्चा मी काही कम्युनिस्ट व काही संघीय मतप्रणालीच्या लोकाशी केली. चर्चेच्या अंती मी ह्याचे कारण मानसशास्त्रीय आहे या निष्कर्षापर्यंत पोहोचलो.

ते कसे ?

लेनिनच्या भाषेत कलकत्त्याच्या मनावर पेटी बूर्ज्वा इटेलेक्चुअॅलिझम् किंवा रिव्होल्यूशनरी इटलेक्चुअॅलीझम् याचा पगडा फार आहे. हा पगडा मध्यमवर्गावर होऊ शकतो. हे लोक स्वप्नाळू असतात, त्याना वास्तवतेच्या बाबतीत कळते पण वळत नाही. त्याच्या डोळ्यासमोर महान् आदर्श असतात, ते मोठे सवेदनाशील, भावनाप्रधान असतात, त्यांना बुद्धी असते, लागणी असते, आवेश असतो आणि म्हणूनच–

They live constantly in tension.

ते अस्वस्थ असतात. त्यांना अन्याय पटतच नाही. जुलूम, अन्याय, अज्ञान यांच्याविरुद्ध त्याचे मन जबरदस्त बंड करून उठते.

पण ते लोक Individualistic फार असतात. याचे कारण त्याना बुद्धी असते, हृदय असते, त्याचबरोबर डोळे असतात, कान असतात. हे लोक विचार करू शकतात.

त्याच्या उलट पंजाबी वा शीख फार विचार करीत नाही. 'हर्ड इंस्टिक्ट्'आढळून येतो आपल्याला पजाबात.

पजाबातही सशस्त्र क्रांतिकारक झाले, तसेच बंगालमध्येही झाले, पण दोघांच्या मानसशास्त्रीय बैठकीत फरक होता. कालीदेवीचा हा बंगाली भक्त बोट कापून देवीच्या प्रतिमेसमोर रक्ताच्या साक्षीने प्रतिज्ञा करी व ती प्रतिज्ञा बाहेर जाऊन पुरी करीत असे. आज ज्योति बसू किंवा त्याचे 'भगत' त्याच प्रखर भक्तिभावाने अंगिकारलेले कार्य तेवढ्याच निष्ठेने, श्रद्धेने, भक्तीने पार पाडताना दिसून येतात.

भारतातील मानवी कच्च्या मालाची संपन्नता बंगालला लाभली आहे. त्याबाबतीत बगालचा नबर पहिला लागेल. पण या सपन्नतेतून आज विकृती जन्मास आलेली आपल्यास आढळते. बगालच्या इंडिव्हीज्युअॅलीझममधून दहशतवाद निर्माण झाला. कारण ? पुन्हा बुद्धी व हृदय यांचे प्राबल्य. बंगाली माणूस अत्यत सवेदनाशील आहे.

हा दहशतवाद उग्र असतो.

जेव्हा दहशतवादी क्रांतिकारक असफल होतो तेव्हा तो आपोआप धर्माकडे वळतो. कारण धर्म ही दाहक उग्रता पचवू शकतो. अरविंदबाबू घोषांचे उत्कृष्ट उदाहरण डोळ्यासमोर आहे.

इथे मला एका कम्युनिस्ट नेल्याने सागितलेली कारणमीमासा पटते. संघाजवळ,

'इंटलेक्च्युअल् अपील्' नाही. तेथे संघाचे चालत नाहीं. संघाच्या विचारसरणीची छाप फक्त अमुकच एका वर्गावर, एका वयावर, एका जातीवर आढळते. तो पगडा वाढत नाही. त्या विचारसरणीची खोली इंटलेक्च्युअल् वर्गासाठी तरी कमी पडते.

लक्षात ठेवा, कलकत्त्यात गांधीही आपल्यास अनुकूल वातावरण तयार करू शकले नाहीत.

कलकत्त्यात टागोरांचा पगडा होता, सुभाषबाबूंचा होता, अरविंदबाबूंचा होता, कारण हे तीन्ही कालीभक्त जहाल होते, तेवढेच धार्मिक होते. ते भावना उचावू शकत होते.

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी तेवढे कार्य करू शकले नाहीत.

साम्यवादाच्या, समाजवादाच्या जबरदस्त भावनाप्रधान विचारसरणीस उत्तर देऊ शकेल, आवाहन देऊ शकेल अशी शक्ती आजतरी संघाजवळ बंगालमध्येच नाही पण साऱ्या भारतभर नाही.

कलकत्त्यात संघाचे कार्य सूक्ष्म प्रमाणात दिसून येत असले तर ते मारवाडी, उत्तर प्रदेशी वगैरे समाजात दिसून येते. जनसंघाचा उमेदवार त्या भागातून उभा रहातो. कदाचित् आत्मरक्षणाच्या स्वाभाविक भावनेतून ह्याचा उगम होत असेल. पण प्रत्यक्ष बंगाली माणूस संघाच्या मतप्रणालीच्या शेकडो योजने दूर आहे.

साम्यवाद्यांना गांधीजी व गुरुजी यांच्यात फरक दिसत नाही. आश्चर्य वाटेल त्यांच्या विकृत नजरेस दोघेही 'बुवा' वाटतात. याचे कारण त्यांची बुद्धी, त्यांची तर्कनिष्ठा.

बुद्धी विपरीत झाली की साक्षर 'राक्षस' बनतो अशा अर्थाचा संस्कृत श्लोक मला डॉ. राधाकृष्णानी मागे सांगितला होता. त्याचे ज्वलंत उदाहरण कलकत्ता.

बंगाली माणूस देशभक्त नाही असे मानावयास मात्र मी अजूनही तयार नाही. अगदी नक्सलाईट किंवा प्रो-पीकींगवादी मार्क्सिस्ट कम्युनिस्टसुद्धा.

मला लोक वेड्यात काढतील हे विधान ऐकून. साहजिक आहे. जे लोक देशाच्या विरुद्ध कट करतात, शत्रूशी हातमिळवणी करतात त्यांना देशभक्त म्हण-णारा वेडा नाही तर कोण ?

येथे बंगालचे मन जाणून घेण्याची जरूर आहे. वृत्तपत्रांतील ठळक अक्षरात छापलेले भडक मथळे वाचून उगीच अस्वस्थ होण्याचे जराही कारण नाही. जी चूक कॉंग्रेसने आजवर केली ती चूक आपण पुन्हा केली तर आपण आपल्या हातांनी पं. बंगालचे उदक शत्रूच्या हातावर सोडण्याचे पाप करण्यास जबाबदार ठरू. बंगाल्याची ही साम्यवादी विकृती वाढवली कोणी ? कॉंग्रेसने घोडचुका केल्या, अपराध केले, पण समाजवाद्यांनी किंवा जनसंघीयांनी ती पापे निस्तरण्यासाठी कोणते प्रत्यक्ष कार्य करून दाखविले या भडकलेल्या व असंतोषी प्रांतात ?

उत्तर एकच.

हल्ला !

मग भडकण्यात काय अर्थ आहे ?

समाजवाद्यानी बंगालमध्ये सदान्कदा साम्यवाद्यांशी हातमिळवणी करून स्वार्थी सत्तेचे राजकारण खेळून साम्यवाद्याना उत्तेजन मिळेल असेच वर्तन केले आहे.

आणि संघीयांनी कामच केले नाही.

एकाचे कुकर्माचे पाप व दुसऱ्याचा नाकर्तेपणाचा अपराध.

मुलगी वयात आली आहे पण तिला तिच्या समाजात कोणी मुलगा स्वीकारायला तयार होत नाही. कोणी तिच्या रंगाकडे, कोणी तिच्या रूपाकडे तर कोणी तिच्या वयाकडे पाहून नाक मुरडतो. अशा परिस्थितीत ती शेजारच्या मुसलमानाचा हात धरून पळून गेली तर रागावण्याचे, भडकण्याचे, संतापाने आकाशपाताळ एक करायचे कारणच काय ?

बातमी वाईट आहे, तिने राग येणे स्वाभाविक आहे, परतु तिच्या मुळाशी जायला नको काय ? आग पूर्णपणे न विझविता उगाच धूर येतो, धूर येतो अशी बोंब मारण्यात काय अर्थ आहे ?

बंगाल आज विकृत निश्चित बनला आहे. पण बंगालची गरज, त्याच्या विकृतीचे मूळ कारण न शोधता उगाचच वायफळ चर्चा करण्यात काय अर्थ आहे ? दुर्दैवाने बंगालचे हे सायको-ॲनॅलीसीस कोणी करीत नाही.

नाहीतर बगालमध्ये आज 'पॉलीटीकल् व्हॅक्यूम' आहे. मावचा संदेश एका अनोख्या नैराश्येतून स्वीकारला जात आहे

१. बंगालच्या मनावर धार्मिक श्रद्धाळूपणाचा जबरदस्त पगडा आहे.

२. बगाल दरिद्री आहे आर्थिक बाबतीत. त्यास धंदा करण्याची खरोखरच अक्कल नाही. बगालचा 'प्रोग्रेसिव्ह थॉट्' त्यातून जन्मास आला आहे.

३. बंगाल अजून सास्कृतिकदृष्टया भारताच्या पन्नास वर्षे पुढे आहे. ही सास्कृतिक मूल्ये जतन करण्याची हौस बगालमध्ये दिसून येते.

कॉंग्रेस या तीन महत्त्वाच्या मुद्याचा विचारच करीत नाही. समाजवाद्यात ती कुवत नाही. कम्युनिस्टात ती कुवत आहे पण त्यांची दानत बिघडलेली आहे. स्वतत्रांना बगालच्या उपसागराशिवाय अन्य स्थान नाही. राहता राहिला फक्त जनसघ.

सह्याद्रीच्या गिरीकुव्हरी हा निद्रिस्त पडलेला हरी आता केव्हा उठणार व काम करणार ?



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ▫ भांडवलवादी हास्य

हसा आणि लठ्ठ व्हा हा उपदेश सगळ्यांना माहीत आहे. पण लठ्ठ होणे म्हणजे साम्यवादाचा विरोध करणं आहे असे दिसते. कारण लाल चीनमध्ये प्रसिद्ध झालेल्या एका लेखात साम्यवादी चिनी जनतेला अशी धोक्याची सूचना देण्यात आली आहे की हसण्याचे गंभीर राजकीय परिणाम होऊ शकतात, तेव्हा हसू नका. म्हणजे शेक्सपियर म्हणाला ते बरोबर होते म्हणायचे. हसऱ्या चेहऱ्याचा माणूसही खलपुरुष असू शकतो असे वरकरणी अजब वाटणारे विधान त्याने कुठल्याशा नाटकात केले तेव्हा त्याला असे सुचवायचे होते की या खलपुरुषाच्या हास्यामुळे साम्यवादाचे हसे होते हे आता स्पष्ट झाले आहे. पण मला वाटते हसण्याचे कोण-कोणते साम्यवादविरोधी प्रकार असतात याची माओने पद्धतशीर वर्गवारी करून दाखवली असतो तर सुतकी चेहऱ्याच्या साम्यवाद्यांना फारच मार्गदर्शन मिळू शकले असते. निदान हिंदुस्थानात तरी जेवढे हसण्याचे प्रकार तेवढे साम्यवादाचे प्रकार असल्याने आपल्याकडे अशी वर्गवारी विशेषच आवश्यक आहे. उदाहरणार्थ, गालातल्या गालात खुद्कन हसणारा दुष्ट उजव्या साम्यवाद्यांचा वैरी असावा. ही-ही-ही करून दात विचकणारा करंटा मध्यमवर्गीय डाव्या साम्यवादाला पाण्यात पाहत असावा. चक्क हा-हा-हा करून हसणारा नीच साम्राज्यवादी अति-डाव्यांचा वैरी असावा; अन् जबडा पसरून खो-खो-खो हसत सुटणारा भांडवल-वादी नराधम अर्थातच नक्षलवाद्यांचे तळपट इच्छिणारा असावा.

## ▫ कपडे फाडण्याचे व्यावसायिक शिक्षण

दिल्लीच्या पॉलीटेक्निकमध्ये आता न्हाव्यांना व धोब्यांनाही त्यांच्या धंद्यांचे प्रशिक्षण देण्याची सोय करण्यात येणार आहे असे परवा वर्तमानपत्रात वाचले. तसे पाहिले तर न्हाव्यांना शिक्षण देण्याची कल्पना नवीन नाही, पण तिच्यात एक महत्त्वाची सुधारणा मात्र करता येईल. ती म्हणजे दिल्लीला असलेली पाण्याची तीव्र टंचाई लक्षात घेता बिनपाण्याची हजामत कशी करावी याचे शिक्षण दिल्यास ते निश्चितच उपयोगी पडेल. एरव्ही जटा वाढविण्याची प्राचीन ऋषिमुनींची फॅशन पुन: सुरू झाल्याने न्हाव्याच्या कलेला कितीसा वाव राहिला आहे हे सांगणे कठीण

आहे धोब्यांना शिक्षण द्यायला मात्र बराच वाव आहे, व त्यांच्यासाठी एखादे क्रमिक पुस्तक तयार केल्यास त्यात पुढील विषयांवर धडे द्यायला हरकत नाही : १. चादरीची मच्छरदाणी कशी करावी ? प्रक्रियेची रूपरेखा. २. 'बटणे तोडणे हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी घेणार,' एक मूलभूत व्यावसायिक तत्त्व. ३. भट्टीत घातलेला रंगीत कपडा पांढरा होतो, पण पांढरा कपडा काळसरच का राहतो याची शास्त्रीय मीमांसा. ४. गरम इस्तरीने जळलेल्या कपड्याबद्दल काय काय कारणे सांगता येतील याची तर्कशास्त्राच्या आधारावर तयार केलेली यादी. ५. हरवलेले कपडे वरकरणी हरवल्यासारखे वाटले तरी 'मॅटर' हे अविनाशी असल्याने ते कोठेतरी असतातच; म्हणजे सूक्ष्म दृष्टीने विचार करता, हरवलेले नसतातच : एक शास्त्रशुद्ध स्पष्टीकरण.

## ◻ खिसे कापण्याचा डिप्लोमा

व्यावसायिक शिक्षणावरून आठवण झाली. चिली या दक्षिण अमेरिकन देशात म्हणे, खिसे कापण्याचे शिक्षण देणारी शाळा असल्याचे उघडकीला आले आहे. आता एफिशियन्सीच्या आजच्या जमान्यात अशी एखादी शाळा निघणे अपरिहार्यच होते. जगात हल्ली चोऱ्यामाऱ्यांचे प्रमाण फार वाढले आहे असे आपण म्हणतो याचे मुख्य कारण म्हणजे चोऱ्यामाऱ्या करणारे पकडले जातात हेच नाही का ? परवा एक चुटका वाचला – एक माणूस नोकरीसाठी छापील अर्ज भरीत होता. त्यात एक प्रश्न होता : तुम्हाला कधी अटक झाली होती काय ? त्याने उत्तर लिहिले : नाही. पुढचा प्रश्न होता : का ? अर्थात वरच्या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी असले तरच याचे उत्तर हवे होते. तरी त्याने उत्तर दिले : कधी सापडलोच नाही. तेव्हा, सांगायचे काय, खिसे कापण्याचे टेक्निकल ट्रेनिंग देण्याची सोय असल्याशिवाय बावळट खिसेकापूंमुळे निर्माण होणारी पोलिसांची डोकेदुखी संपणार नाही. या शिक्षणात आवश्यक असणाऱ्या विषयांची संपूर्ण यादी देणे अनुभवाच्या अभावी अस्मादिकांना जमणे शक्य नसले तरी ठळक विषयाची कल्पना करता येईल. ते म्हणजे कुठल्या कापडाच्या खिशासाठी कुठल्या कंपनीची ब्लेड योग्य आहे; खिशाच्या आत ठेवलेले पाकीट जड आहे की हलके हे ओळखण्याची दिव्यदृष्टी कशी संपादन करावी; पळण्याचा प्रसंग आला तर कुठल्या कंपनीचे जोडे रनिंगसाठी चांगले, इत्यादी.

◻ ◻ ◻

# कलाप्रदर्शन

अरुण फुले

बालगंधर्व रंगमंदिराचे चित्रकलादालन. सकाळी ९-३० ची वेळ. उपस्थित निमंत्रित स्त्री-पुरुषांचे घोळके जमलेले आहेत. लखनवी झब्बा, पॅन्ट वेशातील एक तरुण चित्रकार उद्घाटकांना चित्रविषय समजावून देत आहे. प्रत्येक कलाकृतीमागे असलेली मध्यवर्ती कल्पना, आशय इत्यादि स्पष्ट करून सांगत आहे. सांगण्याच्या पद्धतीवरून चित्रकला विषयाबद्दल त्याने बरेच वाचन केले असावे हे जाणवते. मी एका घोळक्यात उभा राहून चित्रकाराचे बोलणे ऐकत आहे. प्रदर्शन पहाण्यापूर्वी चित्रकाराचा परिचय करून घेण्यासाठी मी त्याचेशी बोलतो.

चित्रकाराचे नांव अरुण फुले. व्यवसाय मेकॅनिकल इंजिनियर. चित्रकलेचे शास्त्रोक्त शिक्षण घेतलेले नाही. कॉलेजजीवनात प्रवेश करेपर्यंत स्वतःमध्ये चित्रकलेची काही बीजे असतील याची कल्पनाही नाही. लहानपणापासून चित्रे पहाण्याची आवड. प्रदर्शने मिळतील तिथे व तेवढी पाहिलेली. यातूनच आपण असे काही करावे ही भावना निर्माण होते. प्रयत्नाला सुरुवात होते. मार्गदर्शन फक्त पुस्तकाचे. प्रत्यक्ष रेखाटण्याचा सराव कमी. त्यामुळे ते काहीसे कच्चे. पण कल्पना तरल. जाणीव चांगली. जिद्द न सोडता चित्रांचे प्रयोग सुरू केले. हळू हळू जमू लागले. आताचे हे पहिलेच प्रदर्शन.

मी मग प्रदर्शन पाहू लागतो. यामध्ये निसर्गचित्रे, रचनाचित्रे, प्रतीकचित्रे, स्थिर-चित्रे व एकदोन व्यक्तिचित्रे आहेत. फुले यांच्या चित्रांवर पाश्चात्य चित्रकलेची व चित्रतंत्राची छाप आहे असे दिसते. विशेषतः रंगसंगतीमध्ये त्यांनी योजलेले रंग, चित्रातील त्यांनी रेखाटलेल्या स्त्रियांच्या आकृती हे दर्शवतात. काही भारतीय स्त्रियांची चित्रेही त्यांनी रंगवलेली आहेत. 'यलो' (क्र. ४८) हे चित्र चित्राचा विषय मांडण्याच्या वेगळ्या कोनामुळे व पिवळ्या रंगाच्या वैशिष्ट्यपूर्ण वापरामुळे लक्ष वेधून घेते. व्यक्तिचित्रामध्ये रविशंकर यांचे चित्र केशरी, हिरव्या व निळ्या रंगांचा वापर करून रंगवले आहे. या चित्रातील वातावरण जाणवण्याजोगे आहे.

प्रतीकात्मक चित्ररचना हा या चित्रकाराचा विशेष आवडता प्रकार दिसतो. कल्पनाशक्ती व योग्य त्या रंगछटांचा वापर करून अपेक्षित परिणाम या चित्रातून निर्माण केला आहे. 'कांपोझीशन' (५४) पीक एक्पीरियन्स ही चित्रे तसेच 'क्रोध' (२) ही चित्रे चांगली आहेत. विशेषतः क्रोध या चित्रातील काळया रंगाच्या पार्श्वभूमीवर वापरलेला केशरी-लाल असा पॅटर्न चित्राचा आशय स्पष्टपणे दर्शवतो.

निसर्गचित्रांच्या प्रकारात चित्रकाराने काही वेगळे प्रयोग करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. ही निसर्गचित्रे प्रत्यक्ष या स्थळी बसून केलेली नाहीत हे चित्रकाराने स्वत:च सांगितले आहे. काही विशिष्ट निसर्ग स्थळाचे चित्रकाराच्या मनावर पडलेले प्रतिबिंब या निसर्ग-चित्राचे द्वारे व्यक्त करण्याचा त्याचा प्रयत्न आहे. 'यलो सनसेट' (५१) 'सी स्केप' (६१) ही निसर्गचित्रे या दृष्टिकोनातून लक्षणीय वाटतात.

नवचित्रकलेतील सध्याच्या काही आविष्कारपद्धती फुले यांनी हाताळल्या आहेत. या कलाकृतींच्या मागे काही विशिष्ट विचार आहेत. आशय आहेत, असे फुले सांगतात. या प्रत्येक चित्रातून ते काहीतरी सांगू इच्छितात. जीवनात आलेले काही करुण, गंभीर, उदात्त, असे अनुभव चित्रद्वारे व्यक्त करण्याचा त्याचा प्रयत्न आहे. 'लमाणी गर्ल' (७) 'द क्राय' (३१) यासारखी काही चित्रे त्या संदर्भात उदाहरणे म्हणून देता येतील. फुले यांची बहुतेक चित्रे सध्याच्या प्रचलित शैलीची आहेत. त्यांच्या पहाण्यात आलेल्या प्रदर्शनातील चित्रकृती तसेच वाचनात आलेल्या पुस्तकातील चित्रतंत्राबाबतचे विचार यांचा तो, सहज-परिणाम असावा. आपल्याकडच्या भारतीय अशा चित्रशैलीची चित्रे या प्रदर्शनात कमी दिसतात. तसेच 'रिॲलिस्टिक' अगर सेमि-रिॲलिस्टिक चित्रे करण्याकडे त्यांची प्रवृत्ती दिसत नाही. चित्रकलेचे शास्त्रोक्त शिक्षण घेण्याची संधी त्यांना मिळालेली नाही, त्यामुळेच रेखाटण (Sketching) हा भाग त्यांच्या चित्रांत अभावानेच दिसतो.

व्यवसायाने तंत्रज्ञ असलेला एक तरुण चित्रकलेच्या ओढीमुळे तिकडे वळतो, त्या क्षेत्रात रमतो, पाहिलेल्या चित्रातून प्रेरणा घेतो व स्वतः काही करण्याची सतत धडपड करतो; रेखाटण कसे करावे, रंगाचा वापर कसा करावा, रचना कशी करावी हे निरनिराळे ग्रंथ वाचून व प्रयोग करून शिकतो. आपला व्यवसाय सांभाळून चित्रकला-व्यासंग सतत चालू ठेवतो ही विशेष उल्लेखनीय गोष्ट आहे. हा प्रदर्शनाचा पहिलाच प्रपंच या दृष्टिकोनातून पहाता भवितव्याबद्दल काही अपेक्षा निर्माण करणारा आहे याची जाणीव होते.

— वसंत सहस्रबुद्धे

केंब्रिज सोसायटीचे नवे नाटक

# द रिक्रूटिंग ऑफिसर

केंब्रिज विद्यापीठाचे मुंबईतील एक सदस्य दरवर्षी एक नाटक सादर करतात. या नाटकाच्या मोजक्या प्रयोगांचे उत्पन्न ज्या शिष्यवृत्ती फंडामध्ये जमा होते त्यातर्फे दरवर्षी एक विद्यार्थी केंब्रिज येथे उच्च शिक्षणासाठी जाऊ शकतो. यामुळे मुंबईतील नागरिकांना केंब्रिज सोसायटीबद्दल विशेष जवळीक वाटते. परतु या सोसायटीचा विशेष असा की मुंबईत फंड जमवण्यासाठी इतस्ततः केल्या जाणाऱ्या करमणुकीच्या इतर कार्यक्रमापेक्षा या सोसायटीने सादर केलेल्या नाटकाचा दर्जा फारच चागला असतो. श्री. डेरेक बॉंड हे या सोसायटीचे नाट्यदिग्दर्शक मुंबईच्या कलाजगतात ख्याती पावलेले आहेत. (आनुयीच्या 'बेकेट' या नाटकावरील चित्रपट मुंबईत येण्याआधीच त्यांनी हे नाटक मुंबईत रंगमंचावर आणले होते.)

या वर्षी त्यांनी सतराव्या शतकातील जॉर्ज फरकहर (George Faquhar) या आयरिश नाटककाराची 'द रिक्रूटिंग ऑफिसर' ही सुखात्मिका निवडली होती. इंग्रजी वाङ्मयेतिहासात ज्याला 'रेस्टोरेशन कॉमेडी' म्हणतात त्या धर्तीचे हे नाटक मराठी प्रेक्षकाला फार जवळचे वाटते. कारण विसाव्या शतकाच्या अर्ध-पूर्वार्धातील, समजुतीचे घोटाळे, वेषांतरे इत्यादीवर आधारलेल्या मराठी नाटकाचा चेहरामोहरा बराच वरील पद्धतीच्या नाटकांसारखा आहे.

प्रस्तुत नाटकामधील कथानक, पोशाखी लष्करी अधिकारी आणि त्यांची प्रेमपात्रे यांच्यावर आधारलेले आहे. खरे सांगायचे तर आजच्या प्रेक्षकाला त्या कथानकात कसलेच स्वारस्य नाही. परंतु केंब्रिज सोसायटीने हा नाट्यप्रयोग ज्या सफाईने सादर केला ती सफाई मनोवेधक वाटली. या नाटकाची रचना छोटया छोटया प्रवेशांची आहे. अशा प्रवेशांसाठी जुन्या मराठी रंगमंचावर गुंडाळी पडदे वापरले जात तर आज सरकता, फिरता वा जॅक नाईफ रंगमंच वापरला जातो. परंतु या नाट्यप्रयोगात, उभ्या केलेल्या सेटच्याच भिंती आतून–बाहेरून वेगवेगळ्या रंगवून–सजवून, त्या फिरवून काही क्षणात वेगवेगळे प्रवेश ज्या शिस्तीने आणि चातुर्याने सादर केले त्याबद्दल दिग्दर्शक डेरेक बाँड, नेपथ्यकार श्री. राजपूत व त्यांचे सहकारी यांचे अभिनंदन करणे आवश्यक आहे. मूळ नाट्यरचनेतील कृत्रिमतेवर मात करून या दिग्दर्शकाने केलेला प्रस्तुत प्रयोग पाहताना, मराठीतील जुनी नाटके अशा नव्या पद्धतीने कल्पक दिग्दर्शकांनी सादर का करू नयेत, असा प्रश्न सहजच मनात उद्‌भवला. या नाट्यप्रयोगात व्यक्तिगत अभिनयाला फारसा वाव नव्हता. तरी श्री. मॉरिस हॉल यांचा, काईट या बिलंदर लष्करी अधिकाऱ्याच्या भूमिकेसाठी स्वतंत्र उल्लेख करता येईल. (या नटानेच 'गॅसलाईट' नाटकात एका डिटेक्टिव्हची भूमिका झकास वठवली होती.) कलापूर्ण अभिनयापेक्षाही या नाट्यप्रयोगात जाणवले ते सांघिक अभिनयाचे कौशल्य आणि रंगमंचावरून प्रयोग सादर करण्यातील शिस्त. मराठी रंगमंचावर मुंबईतील इंग्रजी रंगमंचावरील नटवर्गापेक्षा उच्च दर्जाचा नटवर्ग असूनही कल्पकतेच्या व संघशिस्तीच्या अभावी अनेकदा प्रयोग हवा तितका वठत नाही. अशा इंग्रजी नाट्यप्रयोगांकडून आम्हाला पुष्कळ काही शिकता येणार नाही काय ?

**– सौ. पुष्पा भावे**


**आणि हे बघ...लोणचे करतांना वावरून जाऊं नकोस. सरळ ठाकूर यांचा लोणच्याचा तयार मसाला वापरून "ह्यांना" खुष कर**



लोणची कमी श्रमांत, अल्प खर्चात रुचकर, टिकाऊ व चवदार बनतात.

**ठाकूर** आणि मंडळी

माहीम, मुंबई-१६.

लोकसभेत जातीय दंगली... पृष्ठ ५ वरून

जवळ संघ-कार्यकर्ते दिसले असते. शेतकऱ्यांच्या, दलितांच्या वस्तीतून ते दिसले असते. पण हिंदू संस्कृतीचा ठेवा जतन करण्याचा आव आणणारे हे सघीय, बहुसंख्य हिंदूकडे कायमची पाठच फिरवून आहेत. ह्या निष्क्रियतेला कंटाळूनच त्यातल्या काहींनी जनसंघाच्या पीठावरून राजकारणात उडी घेतल्या. म्हणूनच रा. स्व. संघात जनसंघाला नेतृत्व पुरवल असल तरी, जनसंघ नि संघात फरक आहे. एक राजकीय क्षेत्रात पुढे पावले टाकतो आहे; काही असो सामान्यापर्यंत पोचतो आहे; तर संघ निष्क्रिय आहे; नि म्हणूनच नगण्य आहे. विस्तारीत क्षेत्रात आल्यामुळे जनसंघात नकळत खूप बदल झाले आहेत. त्यांचे संघीय नेतृत्वही बदलत आहे. तिथे नवीन आर्थिक, राजकीय, सामाजिक जाण दिसून येत आहे. रा. स्व संघ मात्र आहे तिथेच आहे. जुन्या संकुचित प्रवृत्ती ! आजही तो काळाप्रमाणे बदलायला तयार नाही. समाजापासून दूर दूर राहतो आहे. बहुमोल तरुण वर्गाच्या एका समूहाला समाजापासून अलग ठेवत आहे. अर्थात पुढे संघ जनसंघाला नेतृत्व पुरवू शकणार नाही. जनसंघाला ते समाजातच शोधाव लागेल. आजच ही प्रक्रिया सुरू झाली आहे. अर्थात अशा परिस्थितीत शतप्राय रा. स्व. संघाला काय स्थान उरणार, हे सांगायला हवंच अस नाही. असा सर्वार्थानं समाजापासून, जनतेपासून दूर राहणारा संघ जातीय दंगली माजवण्याइतपत समर्थ आहे असं म्हणणच हास्यास्पद आहे. म्हणूनच, कुठल्याही दंगलीनंतर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर होणारी टीका पाहिली की हसू येत !

## एक आदर्श उपक्रम !

चौथ्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा पंतप्रधानांनी नुकताच लोकसभेला सादर केला. आराखड्याचं चित्र तूर्त तरी आशादायक आहे. परंतु जसजशी वर्षे जात राहतील तसतस हे चित्र आशादायक बनत जाईल का ह्याबाबत मात्र शंका आहेत. योजनेचा पसारा फार मोठा आहे. उत्पन्न आणि योजनेवरील खर्च, ह्यांचा नेमका मेळ कसा घालायचा, योजनाकाळात जाणवणारी २६० कोटी रु. ची तूट नेमकी कशी भरून काढायची ह्याचं दिग्दर्शन ह्या आराखड्यात नाही. बहुतेक सर्वच राज्यांनी यंदा तुटीचे अर्थसंकल्प जाहीर केले आहेत. नवे कर कुठेही नाहीत. केंद्रीय अर्थसंकल्पात नवे कर आहेत, पण तुटपुंजे. शिवाय पुढील वर्ष, म्हणजे १९७२ च्या निवडणुकांपूर्वीचं वर्ष. त्यावर्षी कुणी कर वाढवील हे सुतराम शक्य नाही. मग

योजनेसाठी लागणारा अवाढव्य पैसा कसा उभा राहणार? त्याचं निश्चित दिग्दर्शन कुठेही नाही. बरे, योजनेपैकी बराचसा भाग सरकारी क्षेत्रातल्या उद्योगधंद्यासाठी आहे. जवळजवळ ६०% सध्या अस्तित्वात असलेल्या सरकारी उद्योगधंद्यांकडे नजर टाकली की परिस्थितीच गाभीर्य लक्षात येतं. अर्थात योजनाकाळात विकासाचा वेग ५·५ टक्के म्हटल्याप्रमाणे राहील का हेही प्रश्नचिन्ह उभं राहतं. हा विकास-वेग कमीत कमी ८·५ टक्के झाला तर इंजिनियरीग पदवीधराना पुरेशा नोकऱ्या उपलब्ध होऊ शकतील असं नुकतंच, इंजिनियरीग इन्स्टिटयूटने प्रसिद्ध केले आहे. इंजिनियरांच्या बेंकारीचा प्रश्न आजच भेडसावू लागला आहे. अशा वेळी विकास-वेग ८·५ टक्के तर नव्हेच पण ५·५ टक्क्यांच्याही खाली घसरला तर काय परिस्थिती उद्‌भवेल हे सांगायलाच नको. अशा परिस्थितीत एक लहानसा आशेचा किरण दिसला परवा. आंध्र प्रदेश लघुउद्योग मडळाने ह्या दृष्टीने आखलेली योजना खरोखरच आदर्श ठरावी.

आंध्र प्रदेश लघुउद्योग मंडळाने हिंदुस्थान मशीन टूलसच्या हैद्राबाद शाखेच्या सहकार्याने ही योजना आखली आहे. ह्या हैद्राबादेतील कारखान्यास बहुविध छोटे छोटे सुटे भाग लागतात. हे भाग, लघुउद्योग मंडळाने निवडलेल्या बेकार इंजिनियर्सनी बनवायचे व ते कारखान्यानी विकत घ्यायचे अशी ही योजना आहे. हिंदुस्थान मशीन टूल्स ह्या छोटया भागाच्या उत्पादनासाठी आवश्यक तो कच्चा माल ह्या इंजिनियर्सना पुरविणार आहे. तर लघुउद्योग मंडळ व आंध्र सरकार त्यांना औद्योगिक गाळे, मशिनरी पुरविणार आहे. तयार माल अर्थातच हिंदुस्थान मशीन टूल्स घेणार आहे. अशा तऱ्हेने बेकार इंजिनियर्सना प्रत्यक्ष कामाला उद्युक्त करून, त्याना स्वावलंबी अर्थार्जन साधन प्राप्त करून द्यायची ही योजना निश्चितच स्वागतार्ह आहे. अनुकरणीय आहे. ही योजना, वशिलेबाजी टाळून कार्यक्षमतेनं चालवली गेली, व तिची व्याप्ती वाढवली गेली, तर ती आदर्श तर ठरेलच; पण औद्योगिक विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने ते एक महत्त्वाचे पाऊल ठरेल. तरुणानाही त्यापासून नवीन उत्साह मिळेल.

भारतात अगडबब व्यवसाय कारखाने खूप आहेत. सरकारी व खाजगी दोन्ही क्षेत्रात ते आहेत. ह्या सर्व बडया कारखान्यानी जर वरील आदर्श स्वीकारला आणि राष्ट्रीकृत बँकांनी जर मदतीचा हात पुढे केला, तर मला वाटतं सर्वत्रच ह्या प्रयत्नाला वाव मिळावा. ह्यामुळे उद्योगधंद्याचे विकेंद्रीकरण तर होईलच, पण उगाचच वेळोवेळी घोषित केल्या जाणाऱ्या समाजवादाच्या दृष्टीनेही पुढचे पाऊल पडेल. सबंध भारत आणि असंख्य खाजगी उद्योगधंदे हे पाऊल उचलतील का हा मात्र प्रश्न आहे. नि त्याचं उत्तर मिळेपर्यंत आंध्र प्रदेश लघुउद्योग मंडळ व एच्. एम्. टी. ह्यांच्या संयुक्त प्रयत्नाला मात्र आपण सुयश चिंतू!

□ □ □

करावेसे वाटत. मनापासून ! इतके की परिस्थितीचा विचित्रपणा पाहून तो एवढा वैतागला आहे का येत्या दोन-तीन वर्षात स्टेट्स्ला (अमेरिकेला) कायमचे राहण्या-साठी तो जाणार आहे. गुड बाय टु इंडिया.

हमीद दलवाईसारखे जे समाजसुधारक मुस्लीमामध्ये आहेत त्याच्याविषयी त्यांच्याच जमातीला आदर नाही. मागेच सांगितल्याप्रमाणे कितीही सुशिक्षित मुस्लीम असले तरी ते आपल्या धर्माचा जाज्वल्य अभिमान बाळगतात. त्यांना धर्म-सुधारणा पसंत नसते. धर्मात ढवळाढवळ नको. बाकी उदारमतवादी. आणि हमीद दलवाई लिहितात मराठीत. मागे महाराष्ट्र विधान परिषदेत श्री. मोहिउद्दीन हॅरीस यांना सांगितले होते, श्री. दलवाई यांनी फक्त ब्राह्मणी मराठी पेपसमध्येच लिहावे. मराठी कोण वाचतो ?

हिंदू जातीवाद ही मुस्लीम जातीवादाची प्रतिक्रिया आहे. मुस्लीम जातीवाद नष्ट केल्याशिवाय हिंदूंचा जातीवाद नाहीसा होणार नाही हे समजस मुस्लीमही मान्य करतील. त्यामुळे नुसता हिंदू जातीवाद गाडून भागणार नाही. त्यामुळेच रा. स्व. संघ, शिवसेना यावर बंदी घालण्याचे बोलणे विफल होय. जनसंघाला मी जाती-वादी म्हणणार नाही. पण भिवंडी प्रकरणामुळे त्या पक्षाविषयीची सहानुभूती वाढली हे तरी कसे नाकारता येईल ? जनसंघाविषयी कधीही चांगले न बोलणारे अनेक तरुण विद्यार्थी भिवंडीपासून 'भारतीयीकरणा'बद्दल सहानुभूतीपूर्वक बोलताना मी प्रत्यक्ष ऐकले आहेत. हे कशाचे लक्षण ?

आणि भिवंडीच्या बाबतीत जनसंघ व शिवसेनेला शिव्या घालणाऱ्यांना हे माहीत नाही काय की भिवंडीत हिंदू फक्त तीस टक्के आहेत आणि तेही विविध भाषिक व असंघटित. या उलट सत्तर टक्के मुस्लीम चांगलेच संघटित आहेत. त्यांच्यात मुंबईतून हद्दपार केलेले गुंडही आहेत आणि व्हिसा संपलेले पाकिस्तानीही आहेत. एकमेकांच्या मोहल्ल्यातुन मिरवणुका नेऊन घोषणा देत कुरापती काढायच्या हा पॅटर्न आता सर्व भारतात ठरला आहे. भिवंडीतही तसेच झाले. शिवजयंतीच्या मिरवणुकीत घोषणा दिल्या गेल्या. जनसंघीयांच्या म्हणण्याप्रमाणे 'पाकिस्तान मुर्दा-बाद' ह्या घोषणा दिल्या तर त्यात मुसलमानांना का झोंबावे ? मुस्लीम लीग-वाल्यांच्या म्हणण्याप्रमाणे केवळ पाकिस्तान विरोधीच नव्हे तर सर्व मुस्लीमाविरुद्धच अतिशय गलिच्छ, बीभत्स घोषणा दिल्या गेल्या. समजा हेही मान्य केले आणि घोषणा देणाऱ्यांना दोषी ठरविले. पुढे काय झाले ? ॲसिड बल्ब्स्, हातबॉंब, रायफल्स्, पिस्तुले याचा एवढ्या मोठ्याप्रमाणावर संघटित वापर एकाएकी कसा झाला ? नंतर ॲसिडने भरलेले ड्रमचे ड्रम्स् पोलिसांना सापडले. ॲसिड काही बाजारात जाऊन सहज विकत घेण्यासारखी वस्तू नव्हे. मग भिवंडीमध्ये ॲसिड आणि हातबॉम्ब्स् एवढ्या प्रचंड प्रमाणा-

वर कोठून आले ? एकच निष्कर्ष निघतो. याची तयारी फार पूर्वीपासून चालू होती. आता हे सर्व प्रकरण न्यायप्रविष्ट झाले आहे. त्यामुळे तपशिलात जाऊन चर्चा करता येणार नाही. दैनिक वृत्तपत्रांमध्येही खूप छापून आले आहे. ते इथे पुन्हा देण्यात हशिल नाही. या सर्व वृत्तांमधून एकच गोष्ट अतिशय स्पष्ट दिसते. हिंदूनी जर कुरापत काढली असेल तर मुस्लीमांचा प्रतिकार अतिशय सघटित आणि आक्रमक होता. जणू ते या संधीचीच वाट पाहत होते. चव्हाणानीच खुद्द राज्यसभेत सांगितले की भिवंडीत मरणाऱ्यांमध्ये मुस्लीमांची सख्या अधिक आहे. त्यामुळे बोलणेच खुटले. पण मुंबईत आणि भिवंडीत वेगळेच ऐकू येते. परतु नतर जळगाव, महाड आदि ठिकाणी आणि ठाण्याच्या परिसरातील खेड्यात जे प्रकार घडले तिथे बहुसंख्य मुस्लीमानाच त्रास झाला. ठाणे जिल्ह्याचे अधिकारी म्हणत होते या दगलीमागे परकीय हात आहेत. हे परकीय हात कोणते ? पाकिस्तानी की सी. आय. ए. ? याविषयी तर्क-कुतर्क चालू आहेत.

आणखी एक संशयास्पद घटना. जळगावमध्ये दंगल पसरताच ताबडतोब लष्कर बोलावले गेले. भिवंडीमध्ये का नाही ? भिवंडीतील परिस्थिती अधिक स्फोटक होती, दंगल मोठ्या प्रमाणावर होती आणि ती आजूबाजूला पसरत होती. मग भिवंडीत लष्कर का बोलविले गेले नाही ? असा प्रश्न इथे विचारला जात आहे.

अनेक पक्षोपपक्षानी, संघटनांनी दोन्ही सरकारांच्या गुप्तपोलिसांनी सावधगिरीच्या सूचना दिलेल्या असताना महाराष्ट्र सरकार एवढे गाफील कसे राहिले ? सुरक्षा प्रतिबंधक कायद्यांसारखे कायदे हाताशी असताना पोलिसांनी भिवंडीत शिवजयंतीपूर्वी माहितीच्या गुंडाना का अडकविले नाही ? राजकीय कार्यकर्त्यांना अडकविण्याच्या बाबतीत तर सरकार अति उत्साह दाखविते. एक महिन्यापूर्वी महाराष्ट्र सयुक्त समाजवादी पक्षाचे अध्यक्ष श्री. ब्रिजलाल पाटील यांना ते केवळ श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या जळगावच्या सभेत अडथळा आणतील या भीतीने अटक केली होती. ही पोलिसी तत्परता भिवंडीत दिसली नाही. एवढेच नव्हे तर


स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

या वर्षी शिवजयंतीच्या वेळचा भिवंडीचा पोलीस बंदोबस्त दरवर्षीपेक्षा कमीच होता म्हणे. असे का?

शिवाय पोलीसांची तक्रार ही की त्यांच्याजवळ शस्त्रे नव्हती. सशस्त्र जमावा-बरोबर त्यांना नि:शस्त्र लढावे लागले. त्यामुळे ते काही करू शकत नव्हते. एक अधिकारी म्हणाला, 'दंगल सुरू झाल्याबरोबर ती काहीही करून मोडून काढा अशा अधिकारयुक्त सूचना आम्हाला नव्हत्या. गोळीबाराचा तर हुकूमच नव्हता. त्यामुळे आमच्या कामाला भलत्याच मर्यादा पडल्या. दंगलीचे स्वरूप तीव्र झाले तेव्हा पोलिस कमी पडले. लगेच न्यायालयीन चौकशीची मागणी सुरू झाली. आणि त्याला मान्यताही मिळाली. अशा परिस्थितीत आम्ही परिस्थिती आटोक्यात आणणार कशी? आम्ही नियमांच्या थोडे बाहेर जाऊन दंगल शमविण्याचा प्रयत्न केला आणि उद्या न्यायालयीन चौकशीत आम्ही दोषी ठरलो तर आमच्या नोकऱ्या जातील, मंत्र्यांची मंत्रिपदे जाणार नाहीत. पोलिसांचे नाहक बळी जाऊन त्यांची कुटुंबे रस्त्यावर उघडी पडतील. असे मागे घडले आहे. 'वाट्टेल ते करून दंगल मोडून काढा आम्ही चौकशी वगैरे काही करणार नाही.' असे सरकारने सांगितले असते तर चोवीस तासात दंगल आटोक्यात आणता आली असती.'

या सर्व प्रश्नांची उत्तरे आता न्यायालयीन चौकशीत तरी बाहेर पडतील अशी आशा इथे दाखविली जात आहे.

काही लोक छिद्रान्वेषी असतात. दंगलीनंतरच्या गोष्टीतही या लोकांना राज-कारण दिसते. दंगलीच्या आणि महाराष्ट्रीय पोलिसांच्या नालायकीच्या गोष्टी चव्हाणांनी राज्यसभेत सांगाव्यात यामध्ये या लोकाना कावा दिसतो. वसंतराव नाईकांचे सध्या दिल्लीत वजन वाढते आहे. ही गोष्ट अर्थातच चव्हाणांच्या हिताची नाही. म्हणून महाराष्ट्र पोलीस म्हणजे पर्यायाने गृहखाते सांभाळणारे मुख्यमंत्री नाईक यांना दंगल बरोबर हाताळता आली नाही हे सांगण्याचा प्रयत्न. आता ह्या कुत्सितपणाला काय म्हणावे! तसाच काहीसा आरोप बाळासाहेब देसायांवरही करण्यात येतो. भिवंडीच्या दंगलग्रस्त भागांना भेट दिल्यानंतर त्यांनी पोलिसांच्या वागणुकीबद्दल उघड उघड वार्ताहरांजवळ नाराजी व्यक्त केली. ठीक आहे. बाळा-साहेब नाराज झाले असतील. पण ही नाराजी उघड व्यक्त करायची? ते सरकारचे एक जबाबदार मंत्री आहेत. त्यामुळे पोलिसांच्या नालायकीला मंत्रिमंडळाचे सदस्य या नात्याने तेही जबाबदार ठरतात. आपली मत त्यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडावीत — वगैरे. असो आपल्याला या निंदा नालस्तीशी कर्तव्य नाही.

आपल्याला कर्तव्य आहे ते या दंगलीमागे दडलेल्या मूलभूत प्रश्नाविषयी. या प्रश्नांना कोणी नेता हात घालतो आहे काय? कुणी पक्ष हा प्रश्न सोडविण्यासाठी हिरीरीने पुढे येतो आहे काय? जनसंघाचा भारतीयीकरणाचा कार्यक्रम कितपत शक्य आहे आणि त्यावर कुणाचा विश्वास आहे? त्याला पर्याय काय आहे? वगैरे.


भिवंडीच्या दंगलीमुळे महाराष्ट्र विधानसभेतील अविश्वासाच्या ठरावावरील वाद मागे पडला. ठराव बाद झाला. पण नाईक सरकारही घायाळ झाले होते. विरोधकांच्या मूळ आरोपाना सरकारने उत्तरेच दिली नाहीत. पुण्याचा हिरवा पट्टा काय किंवा मुबईतील एस्. एस्. सी. चे रॅकेट काय आरोपांना परिणामकारक उत्तरेच मिळाली नाहीत. सरकारी मंत्र्यांनी दिलेली उत्तरे त्यांनाच कितपत पटली होती कुणास ठाऊक. विरोधी पक्षनेते श्री. कृष्णराव धुळूप हे आपल्या उत्तराच्या भाषणात म्हणाले देखील की घरी जाऊन मंत्र्यानी स्वतःच्या छातीवर हात ठेवून स्वत लाच विचारावे की आपण दिलेली उत्तरे बरोबर होती किंवा काय.

श्री धुळूपानी अनेक आव्हाने दिलीत. सर्व मत्र्याच्या आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या मालमत्तेची जाहीर चौकशी करावी. श्री. धुळुपानी पुन्हा पुन्हा आव्हान दिले. पण मुख्यमंत्री किंवा इतर कोणताही मत्री छातीवर हात ठेवून हे आव्हान स्वीकारण्यास खडा झाला नाही. हे चित्र विचित्र दिसत होते. श्री. धुळूप पुन्हा आवाज चढवून विचारीत होते, " आहे तुमची तयारी ? माझे आव्हान आहे. ठीक आहे. तुमची तयारी नसेल तर माझी आहे.' माझ्या मालमत्तेची जाहीर चौकशी करा. आहे तयारी ?" ठरावावरील चर्चेत दोन दिवस ज्यांनी अभूतपूर्व गोंधळ केला होता असे कॉंग्रेस आमदार यावेळी मात्र अगदी गप्प बसले होते.

श्री. काळदाते यांच्या भाषणाच्या वेळी एक मजेशीर प्रसंग घडला. त्यांच्या भाषणात कॉंग्रेस आमदारांनी खूपच अडथळे आणण्याचा प्रयत्न केला. पण श्री. काळदाते यांच्या प्रभावी वक्तृत्वाचा ओघ अखंड होता. त्याच्या बोलण्याने कॉंग्रेसचे सदस्यही भारावून गेले असले पाहिजेत. कारण त्यांच्या एका मुद्याला एकाएकी " हिअर हिअर "चा उत्स्फूर्त प्रतिसाद एका कॉंग्रेस सदस्याकडून आला. कोण बोलल, कोण बोललं म्हणून कॉंग्रेसजन एकमेकाकडे सशयास्पद नजरेने कुजबुजत बघू लागले. ज्या कोपऱ्यातून हा प्रतिसाद आला त्या भागातल्या सदस्याना भलतेच अवघडल्यासारखे वाटू लागले. मग आपले निरपराधित्व सिद्ध करण्यासाठी त्या बाजूच्या कॉंग्रेस सदस्यानी काळदात्याच्या भाषणात अधिकच अडथळे आणण्यास सुरुवात केली.

गेल्या आठ–दहा वर्षांत गाजला नाही असा यंदाचा अविश्वास ठराव गाजला असे म्हणतात. याला कारण यावर्षी विरोधी पक्षीयांनी पुराव्यानिशी आरोप केले. कॉंग्रेस सदस्यदेखील यावर्षी आरडा–ओरड करण्याच्या मूडमध्ये होते. पण एक मात्र दिसून आले. पट्टीचा वक्ता असा कॉंग्रेसपक्षात विधानसभेत कुणीच नाही. तर विरोधी पक्षाकडे एखादा दुसराच माणूस नाव घेण्यासारखा निघेल. एकूण काय तर सगळाच सामान्य कारभार. जसा राज्यकर्ता पक्ष तसेच विरोधी पक्ष. त्याला इलाज नाही.

◻ ◻ ◻



# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

३० मे ते ५ जून १९७०

**मेष :** भाग्यवान आहात. सहकुटुंब एखाद्या सहलीला शनिवारीच निघाल. घरच्याच वाहनाने. त्यातल्यात्यात व्यवसाय-धंद्याचा प्रचारपण होईल. जाल तिथे तिथे मित्र मदतीला हजर राहतील. धनस्थानातील पंचमेश रवी सरकारी कामात यश देईल. संततीचा उत्कर्ष होईल. सोमवार-मंगळवार व्यापार-उद्योगात फायदा होईल. घराबद्दल मनासारखी व्यवस्था होईल. प्रसाधने, रंगसाहित्य, फॅन्सी कपडे यांच्या व्यापाऱ्यांना फारच फायदा होईल. बुधवार-गुरुवार रवी-चंद्र धनस्थानात येतील. त्यामुळे धनलाभ होईल. शुक्रवारी नाटयव्यवसायातील या राशीच्या माणसांना यशोमंदिर गाठता येईल. चित्रकलेतील आविष्कार संपूर्णतया दाखविता येईल. त्याबद्दल विशेष प्रोत्साहन व बक्षीसही मिळण्याचा योग आहे. एकच दोष म्हणजे हट्टी स्वभाव. काही वेळा नुकसान करील. त्यावर उपाय १०८ गायत्री जप करणे. नाहीतर सूर्याला १२ नमस्कार घालणे. शुभ तारखा १।२।३।४

**वृषभ :** शनिवारी मित्रांबरोबर प्रवास घडेल. धनलाभ होण्याची शक्यता फार कमी आहे. साहित्यिकांना थोडेसे सावकाश गेल्यानेच फायदा होणार. सोमवार-मंगळवार व्यापार-उद्योगात यशस्वी होण्याचा प्रयत्न निष्फळ होण्याची शक्यता आहे. व्ययातील शनि-बुध पैशाची जमत आलेली कामे बिघडवतील. राहू दशमात आहे. ज्यांचे वय ४२ ते ५२ असेल त्यांना व्यवसायात यश व मानमरातब मिळेल. सरकारी कामात-विशेषकरून घरासंबंधीचे काम मनाप्रमाणे घडून येईल. शुक्र-मंगळ घरच्या सर्व कुटुंबियात आनंदी आनंद निर्माण करतील. विशेषतः पति-पत्नी अत्यंत उपयोगी पडतील. शुक्रवारी अचानक धनलाभ होईल. मातेकडून प्रोत्साहन मिळेल. धार्मिक समारंभात भाग घेण्याचा योग आहे. सासऱ्याकडून अगर मातुल घराण्याकडून आर्थिक मदत चांगलीच होईल. सोमवारी-मंगळवारी नवीन मित्र जोडले जातील. त्यांची सर्वप्रकारे मदत होईल. इंडिकेटचे कामात प्रगती होईल. सर्व आठवडाच शुभ आहे.

**मिथुन :** सर्व ग्रह शुभ स्थानात व शुभ योगात आहेत. रवी व्ययात तेवढा चांगले फल देणार नाही. सरकारी कामात यश मिळण्याचा संभव फार कमी आहे. शनिवारी घरातच काही समारंभ होईल. सोमवार-मंगळवार मित्रमंडळींबरोबर सहलीसारखा आनंददायक प्रवास होईल. विद्यार्थ्यांना, साहित्यिकांना व साहित्याशी

संबंध असणाऱ्या प्रकाशक-मुद्रकानाही हा अनुभव येईल. बिल्डीगची सजावट करणाऱ्या कलाकारांना मनमुराद काम व पैसा मिळण्याचा योग आहे. संततीचा सर्व परीने उत्कर्ष होईल. कलाक्षेत्रातील तरुणाना फारच यशस्वी काळ आहे. त्यांना तर नेहमी विरोध करणारेच जास्त कौतुक करतील, आणि उत्तेजन देतील. बुधवार-गुरुवार घरातील भावडाकरता खर्च करावा लागेल. ता. ५ ला अनपेक्षित धनलाभ होईल. शुभ तारखा १।२

कर्क : गुरु-मगळ-राहू शुभ योगात आहेत. त्यात गुरू सुखाची वृद्धी करील. थोडासा चैनीत काळ घालवण्याकडे मन ओढ घेईल. वडील माणसाना शारीरिक आजार होण्याचा संभव बराच आहे. शनिवारी प्रवासयोग येईल. सरकारी कामाकरता प्रवास करावा लागेल. पत्नीकडून अचानक धनलाभाला मदत होईल. पत्नीच्या नावावर लॉटरी तिकीट घेतल्यास बरेच बरवे बक्षीस मिळण्याचा योग. सोमवार-मंगळवार उद्योग-धंद्याच्या व्यवहारात घोटाळा होऊन मनःस्वास्थ्य बिघडण्याचा फार सभव आहे. बुधवार-गुरुवार सरकारातून येणाऱ्या रकमा हातात पडतील. शभ तारखा ३०।३१।३।४

सिंह : भाग्येश व एकादशेश यांचा अन्योन्य योग, शिवाय रवी लग्नेश दशमात हा अत्यत शुभयोग आहे. १।१०।११ चे अधिपती याच तीन घरात मूळ कुडलीत असल्यास ती व्यक्ती नेहमी सपत्तीत बुडलेली राहते. या आठवड्यात धनलाभ चागलाच होईल. सरकारकडून कामाचे कौतुक व मानमरातब होईल. धाडसाच्या कामात यश मिळेल. मेडिकल व्यवसायातील व्यक्तीचा काहीतरी अपूर्व कार्य करून दाखविण्याचा योग आहे. शरीरशास्त्रात एकादा नवीन शोध लावला जाईल. या राशीच्या व्यक्ती अत्यत व्यवहारी असतात. शनिवार-रविवार अचानक धनलाभ होईल. सोमवार-मगळवार भागीदाराकडून थोड्याशा प्रमाणात मनःस्वास्थ्य बिघडविले जाईल. गृहस्वास्थ्यात पत्नीच्या काही हट्टाकरता मनाविरुद्ध खर्च करावा लागेल. बुधवारी एकाद्या समारभात भाग घ्यावा लागेल. पाच तारखेला अचानक धनलाभ व मोठेपणा मिळेल. शुभ तारखा २।३।४।५

कन्या : महत्त्वाच्या ग्रहांचे भ्रमण उदय गोलार्धातून आहे ते चांगले आहे. त्यांना स्थानबल नाही. अष्टमातील शारीरिक पीडा व शिवाय मानहानी होण्याचा दाट संभव आहे. अचानक धनलाभ होईल. विद्येत अपयश येईल. बुधवार-गुरुवार साहित्य, लिखाण अगर परीक्षेला चांगले जातील. प्रवासयोग आहे. प्रवासात स्वतःच्या उद्योगधंद्याची प्रगती होण्याचा योग येईल. अचानक आर्थिक मदत करणारे भागिदार मित्र शुक्रवारी मिळतील. सर्व फॅन्सी वस्तूच्या धंद्याची वाढ करण्याला व टिकाऊ वाढ होण्याला गुरुवारी सुरुवात करावी. सरकारकडून पूर्ण सहानुभूती आणि आर्थिक मदत मिळेल. गुरुवारी इंडिकेटच्या कार्यकर्त्यांकडन काम होईल. (न, य, व, व किंवा स्वर) या अक्षरांनी नाव सुरु असलेल्या व्यक्तीला जास्त मदत मिळेल. शुभ तारखा ३० व ३।४।५

तूळ : सर्व राजयोगकारक ग्रह केंद्र त्रिकोणात गुरुदृष्ट आहेत. पत्नी, मित्र, भागिदार, संतती सर्वजण सर्वबाजूनी मदत करावयाला तयार आहेत. 'एतत् त्रयं जगति पुण्यकृतो लभते ।।' वरील तीनही गोष्टी-चागली पत्नी, उत्तम सतती आणि सकटात व सुखात सारखेच वागणारे मित्र-हा योग या आठवड्यात आहे. फक्त एकच वाईट योग म्हणजे सरकारी कामात यश प्राप्त होणार नाही. सरकार विरोधी कारवाया करण्याचा सभव आहे. ज्याचे वय ४२ च्या पुढे आहेत त्याना वाईट फळ मिळणार नाही. दंगल झाली ती निष्प्रभ गटाच्या अक्षरांनी सुरू असलेल्या गावानाच झाली. शनिवार-रविवार सरकारी कामात अपयश येईल. सोमवारी संततीच्या भाग्योदयाकरता केलेल्या कामात यश प्राप्त होईल. धार्मिक आचरण व धार्मिक लिखाण हातून होईल. शुभ तारखा ३१ व १।२।५

वृश्चिक : सर्व शुभ योगातील ग्रहांना स्थानबल नाही. ६।८।१२ या पापस्थानात आहेत. सर्व मित्र-शत्रू-सहकारी सर्वच विरोध करणार आहेत. पण एकच चागला योग म्हणजे दशमेश रवी सप्तमात लग्नावर पूर्ण दृष्टी असलेला. काहीही बेकाय-देशीर विधाने केलीत तरी सर्व जगात प्रबल झालेल्या इंडिकेट गटाचा तुम्हाला पाठिंबाच राहील. तुमच्याविरुद्ध कितीही काहूर उठले तरी त्यात यश मिळणार नाही. कारण ते बुध-गुरु व रवी-शनी-चद्र गटाचे आहे. नाव निष्प्रभ गटाचे आहे व आडनाव सिंडिकेट गटाचे आहे. शनिवार-रविवार याबाबतीत अत्यंत चांगले आहेत. या राशीच्या माणसांना संततीकडून अपयश येण्याचा योग आहे. सार्वजनिक कामात पूर्ण यश येईल. बाकी सर्व खाजगी व्यवहारात माघारच घ्यावी लागेल. शुभ तारखा ३०।३१।३।४

धन : एक भाग्येश रवी सोडून बाकी सर्व घरांचे अधिपती केंद्र-त्रिकोणात आणि गुरु एकादशात आहे. फक्त रवी भाग्येश षष्ठात आहे. रवी-चद्रांना ६।८।१२ घराचा दोष नसतो. शनिवार-रविवार चद्राचे भ्रमण चतुर्थातून आहे. ते फारच चांगले आहे. एकाद्या सौख्यदायक समारंभात मुख्य भाग घेण्याचा योग येईल. विद्येत संपूर्ण यश मिळेल. गायनकला, चित्रकला, वैद्यकी यापैकी व्यवसाय करणा-राना पूर्ण यशप्राप्ती मिळेल, आणि धनलाभ चांगला होईल. एकाद्या मित्रामार्फत अगर मातुल घराण्याकडून विवाहाबद्दल स्थळ सागण्यात येईल. सरकारी कामे पुढे ढकलावी. शक्य तर ता. १५।६ पर्यंत. धदा-व्यवसाय वाढविण्याला योग चांगला आहे. हातून पराक्रम होईल. थोडासा भावडांशी मतभेद होईल. सर्व बाबतीत ठरविलेले बेत प्रत्यक्षात आणता येतील. शुभ तारखा ३०।३१ आणि ३।४।५

मकर : राहूशिवाय सर्वच ग्रह शुभयोगात आहेत. कठोर भाषा वापरली जाईल. पैशाचा उन्हाळा होण्याचा योग आहे. राग व बोलणे आवरणे जरूर आहे. धदा-व्यवसाय चांगला चालेल. वरिष्ठांशी मतभेद होणार नाही. साहित्यिक, प्रकाशक, पुस्तक विक्रेते यांना धंदा वाढवावयाला फार चांगला आठवडा आहे. बुध-मगळ


अन्योन्य योग आहे. तो चांगला आहे. शत्रूसुद्धा मदतीला उभे राहतील. सर्व खाजगी व्यवहारात यशःप्राप्ती मिळेल. पण सार्वजनिक व राजनैतिक कामात अपयश येईल. कारण सदोवा पाटील, मरारजी देसाई, जगजीवनराम हे सिंडिकेट गटाचे आहेत. हा गट सध्या राजकारणात मागे पडणारा आहे. शनिवार–रविवार प्रवासाला व धाडसाची कामे करावयाला चांगले आहेत. सोमवार–मंगळवार घरगुती समारंभात आनंदात काळ जाईल. बुधवार–गुरुवार लेखन व्यवसायात, शास्त्रीय विद्याभ्यासात यश प्राप्त होईल. अधिकाऱ्यांच्या भेटीगाठीला योग चांगला आहे. शुभ तारखा ३०।३१ व ३।४।५

**कुंभ :** सर्व केंद्र–त्रिकोणाधिपती शुभस्थानातून भ्रमण करीत आहेत. राहू मात्र मनस्ताप निर्माण करणार आहे. धंदा–व्यवसाय चांगला चालेल. विद्येत यश येईल. छापखान्याचा, पुस्तक प्रकाशनाचा धंदा करणारांना या आठवड्यात प्रगती होण्याचा योग आहे. सरकारचा पाठिंबा मिळेल. संततीकडून पराक्रमाच्या गोष्टी घडतील. मिलिटरीतील या राशीच्या लोकांना अचानक प्रमोशन मिळण्याचा योग आहे. बुधवार–गुरुवार या दृष्टीने फारच चांगले आहेत. सोमवार–मंगळवार चैनीकरता जवळची एकादी सहल करण्याचा योग आहे. डॉक्टरलोकांना एकाद्या संशोधनावर शुक्रवारी सेमीनार होण्याचा योग आहे. मनाचा तोल जाऊ न देण्याचा प्रयत्न करावा. सोमवार–मंगळवार जास्त काळजी घ्यावी. शुभ ता. ३०।३१ व ३।४।५

**मीन :** रवि–चंद्र सोडन बाकी सर्व ग्रह शुभयोगात आहेत, पण शुभस्थानात नाहीत. त्यामुळे त्यांचे फळ अर्धे चांगले मिळेल. रवी तिसरा आहे. सरकार–दरबारात यश मिळेल, व हातून पराक्रम होईल. पण हा सर्व स्वतःकरता, सार्वजनिक किंवा राजकीय कामात नाही. विद्याभ्यासात भरघोस यश मिळेल. व्यक्तिमत्त्वाला कमीपणा येईल. पैसा राहणार नाही. चंद्राचे भ्रमण मात्र १।२।३।४ या चांगल्या स्थानातून होत आहे. त्यातलेत्यात सोमवार–मंगळवार धनलाभ होईल. बुधवार–गुरुवार सरकारी कामे उरकून घ्यावी. शुक्रवारी इष्टमित्र व घरातील सर्व मंडळीसह काही शुभ समारंभात आनंदात दिवस जाईल. सार्वजनिक संस्था चालकांनी प्रत्येक पाऊल विचारपूर्वक टाकावे. व्ययातील राहू हातून चुका घडवील व व त्याला मदत धनस्थानातील शनी करील. त्यावर उपाय दररोज श्रीशंकराचे दर्शन घेऊन त्याला मनोभावे एक बिल्वपत्र वाहावे. सर्व आठवडा शुभ आहे.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर



"तुमच्या वागण्यामुळं तुम्ही माझ्यात किती असुरक्षिततेची भावना निर्माण करता आहात याची कल्पना आहे तुम्हाला ? ..."